# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal


SPECIAL ISSUE ON

# CHALLENGES IN IMPLEMENTING NATIONAL EDUCATION POLICY (NEP) 2020

**Chief Editor :**
Dr. Bapu Gholap

**Executive Editors**
Prin. Dr. B. P. Marje
Prof. (Dr.) Sushil Kumar
Dr. Yuvaraj Pawar
Dr. Navanath Indalkar
Smt. Sandhya Yadav



MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Jan. To March 2023
Special Issue Vol.-I

**Date of Publication
28 Jan. 2023**

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

Executive Editors
- Prin. Dr. B. P. Marje
- Prof. (Dr.) Sushil Kumar
- Dr. Yuvaraj Pawar
- Dr. Navanath Indalkar
- Smt. Sandhya Yadav

विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

Jan. To March 2023
Special Issue Vol.-I



28) माध्यमिक स्तरावरील इतिहास विषयाच्या अध्ययन वृद्धीसाठी नाविन्यपूर्ण अध्ययन...
प्रा. डॉ.सुशील कुमार, योगेश्वर श्रीपाल किर्तीकर, सांगली ||113

29) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या संदर्भात शिक्षक प्रशिक्षणाच्या समस्या आणि दृष्टिकोन
डॉ.लक्ष्मी विष्णू भंडारे, तासगाव ||118

30) इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना गणित विषयातील त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म आशय ...
डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई, जि. कोल्हापूर ||121

31) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० आणि समावेशित शिक्षण
डॉ. नवनाथ ज्ञानदेव इंदलकर, सांगली ||125

32) सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन– नाविन्यपूर्ण विचारधारा
श्री रणजित हणमंतराव देसाई, डॉ.युवराज यशवंत पवार, सांगली ||128

33) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० वैशिष्ट्ये, बहुभाषिकता आणि आव्हाने
रंजना शिवाजी ओलेकर, डॉ.युवराज यशवंत पवार, सांगली ||134

34) राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० : शालेय शिक्षणातील समस्या आणि उपाययोजना
केदारी आप्पासाहेब रसाळ, सांगली ||140

35) नवीन शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात उच्च शिक्षणातील मुक्त शैक्षणिक संसाधनांच्या ...
डॉ. दीपा अनिल पाटील, नंदुरबार ||145

36) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्राथमिक स्तरावर अंमलबजावणी करताना ...
डॉ.नागनाथ अप्पासाहेब येवले, जिल्हा–सोलापूर ||148

37) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भारतीय कला, संस्कृती व भाषेला दिलेले महत्त्व
डॉ. सीमा नवनाथ इंदलकर, सांगली ||152

38) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : ग्रंथालयांची बदलती भूमिका
श्रीमती संध्या गिरीष यादव, सांगली ||155

39) इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना भागाकार क्रिया करताना येणाऱ्या अडचणींच्या कारणांचा ...
श्री. रुपेश लक्ष्मण जाधव, जिल्हा सातारा ||159

40) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणीतील आव्हाने
डॉ. श्री. बिभीषण नाना कराळे, मिरज ||162

41) NEP 2020: Empowering the Teacher
Dr. Pondhe M.S., Dist- Ahmednagar ||166

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209

हाण्यासाठी प्रशिक्षित करायला हवे भारतीय न्याय, समानता, कायदा पालन प्रामाणिकपणा आदर्शाची जपणूक नेतृत्व कौशल्य, अर्थशास्त्रात सहभाग, लोकशाही जीवन प्रणाली विकास, वैयक्तिक नागरिक व आर्थिक जबाबदाऱ्या सर्वांशी मिळून मिसळून राहणे हे यायला हवे

४. बौद्धिक क्षमतांचा उपयोग करण्याची क्षमता निर्मिती याकडे दुर्लक्ष होता कामा नये.

५. सामाजिक अभ्यास शिक्षणाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना तर्कशुद्ध निर्णय कसा घ्यायचा आणि त्याच्या निर्णयावर कसे वागावे हे शिकवणे आहे.

६. बहुविद्याशाखीय व महाविद्यालय यांना केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान मिळणे अत्यावश्यक आहे विनाअनुदान तत्त्वावरील बी.एड.चा खर्च आर्थिक स्थिती सर्वसामान्य असणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांना परवडणारा नसतो.

**समारोप** — हे धोरण भारताच्या शिक्षण व्यवस्थेसाठी एक मोठा मैलाचादगड दर्शवते जे भारताला जगभरातील उच्च शिक्षणासाठी नक्कीच एक आकर्षक स्थान बनवेल. हे धोरण प्रवेश, समानता गुणवत्ता, परवडणारी क्षमता, जबाबदारी आधारस्तंभावर आधारित आहे. आणि भारताला एका दोलायमानज्ञान केंद्रात रूपांतरित करेल.ज्ञानसामुग्री अध्यापन शास्त्र आणि मजबूत प्रशिक्षण शिक्षणाच्या सर्व स्तरावरील सर्व विद्यार्थ्यांना उत्कट, प्रेरित, उच्चपात्र, व्यावसायिक प्रशिक्षित आणि सुसज्जशिक्षकांद्वारा शिकवले जाईल.

**संदर्भ ग्रंथ सूची—**

१. बास्कर, आनंदा, बास्कर, पुष्पा. शिक्षणाचे बहुजनिकरण (२०००) कोल्हापूर फडके प्रकाशन

२. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००० व २००५

३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६

४. राष्ट्रीय आव्हानाकडून कृती कार्यक्रमाकडे

५. Education and National Development: Report of the Education Commission 1964&66 6- Envisioning Teacher Education &In the 10th plan and Beyond National council for Teacher Education New Delhi.

७. पाईकराव, विजयराव राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० policy Document संकलन पाईकराव विजयकुमार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक

30

# इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना गणित विषयातील त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म आशय अध्यापनासाठी समस्यानिराकरण कार्यनितीच्या परिणाम कारकतेचा अभ्यास

डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई
सहयोगी प्राध्यापक.
आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
गारगोटी ता. भुदरगड जि. कोल्हापूर

***********

**सारांश** —

गणित हा विषय बऱ्याच विद्यार्थ्याच्या नावडीचा विषय असतो. तो विषय खूप अवघड आहे. असा गैरसमज विद्यार्थ्यामध्ये असल्याचे दिसून येते. पण गणित विषयाच्या अभ्यासातील सातत्य ठेवले तर गणिते पटपट सोडविता येतात व त्यातून प्रेरणा मिळते. मला गणित सोडविता येते हा आत्मविश्वास निर्माण झाला की विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयासंदर्भात आवड निर्माण होते. यासाठी गणित शिक्षकाने विविध अध्यापन पध्दतींचा, खेळातून गणित, कार्यनितींचा वापर, क्लृप्त्यांचा वापर, गणित अध्यापनात करणे आवश्यक आहे. म्हणूनच संशोधिकेने प्रस्तुत संशोधनात कार्यनितीचा वापर करुन अध्यापनाची परिणामकारकता अभ्यासण्याच्या हेतूने प्रस्तुत विषय निवडला आहे.

**Keywords**— इयत्ता सहावीचे विद्यार्थी, गणित विषय, त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म, समस्या निराकरण कार्यनिती, परिणामकारकता, अभ्यास.

**प्रस्तावना** —

शालेय स्तरावरील सद्यः स्थितीचा विचार करता असे दिसून येते की गणित विषयाकडे पाहण्याचा पालकांचा, विद्यार्थ्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. गणित हा विषय अवघड आहे. अशा समजूतीमुळे त्या विषयाचा अभ्यास केला जात नाही. परिणामी गणितात कमी

गुण मिळण्याचे प्रमाण जास्त असते. गणित हा अमूर्त विषय आहे. तसेच तो क्रमबध्द विषय आहे. एका घटकावर दुसरा घटक अवलंबून असतो. यासाठी शृखंलात्मक पध्दतीने घटक एकमेकांला जोडलेले असतात. एक घटक समजला नाही तर पुढील आशय आकलनात अडथळे येतात. अभ्यासात सातत्य, क्रमबध्दता, सराव असेल तर गणित विषय सोपा वाटतो. यासाठी शिक्षकांनी विद्यार्थी जास्तीत जास्त सराव कशा प्रकारे करतील, त्यांना गणिताबद्दल गोडी कशी वाढेल हा प्रयत्न करणे अभिप्रेत आहे. यासाठी विविध अध्यापन पध्दती, कार्यनिती, गणिती खेळ, क्लृप्त्या, कोडी यांचा गणित अध्ययन अध्यापनात वापर करणे आवश्यक आहे. म्हणूनच संशोधिकेने समस्यानिराकरण कार्यनितीचा वापर अध्यापनात केल्याने विद्यार्थ्यांच्या गणित संपादणूकीत काय फरक पडतो हे अभ्यासण्यासाठी प्रस्तुत संशोधनविषयाची निवड केली आहे.

**समस्याविधान—**

इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्याना गणित विषयातील त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म आशय अध्यापनासाठी समस्यानिराकरण कार्यनितीच्या परिणाम कारकतेचा अभ्यास.

**संशोधन उद्दिष्टे —**

संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित केली आहेत.

१) इयत्ता सहावीच्यां विद्यार्थ्याना गणित विषयातील 'त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म' आशयाचे पारंपरिक पध्दतीने अध्यापन करणे.

२) इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्याना गणित विषयातील 'त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म 'आशयाचे समस्या निराकरण कार्यनितीचा वापरु करुन अध्यापन करणे.

३) इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्याना गणित विषयातील 'त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म 'आशय अध्यापनासाठी वापरलेल्या पारंपरिक व समस्यानिराकरण कार्यनितीच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

**संशोधन महत्व —**

प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहे.

१) विद्यार्थ्याची गणित विषयाबाबतची अरुची पाहता या विषयामध्ये रुची वाढविण्यासाठी गणित अध्ययन अध्यापनासाठी विविध अध्यापन पध्दती बरोबरच क्लृप्त्या, गणिती खेळ, गणिती कोडी यांचा एकत्रित वापर कार्यनितीमध्ये केला तर गणित आकलन सोपे होईल. यासाठी सदर संशोधन महत्वाचे आहे.

२) पालकांना, प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांना समस्यानिराकरण कार्यनिती गणित अध्ययन अध्यापनात कशा प्रकारे वापरावी याची माहिती मिळेल.

३) विद्यार्थ्याना गणित विषयाबद्दलची भिती कमी होऊन गणित विषयाबद्दल अभिरुची वाढेल, आंतरव्यक्तीसंबंध कौशल्य वाढेल यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

**संशोधनाची व्याप्ती —**

१) प्रस्तुत संशोधनामध्ये वापरलेली समस्यानिराकरण कार्यनिती सर्व माध्यमाच्या प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांशी संबंधित आहे.

२) प्रस्तुत संशोधनातील कार्यनिती शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्र प्रशिक्षणार्थीशी संबंधीत आहे.

**संसोधनाची परिमर्यादा —**

१) प्रस्तुत संशोधन हे भुदरगड तालुक्यातील शाहू कुमार भवन, गारगोटी या शाळेतील मराठी माध्यमाच्या इयत्ता सहावीच्या वर्गापुरते मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे सन २०२०— २१ सालापुरते मर्यादित आहे.

३) प्रस्तुत संशोधन हे 'त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म' या आशयापुरते मर्यादित आहे.

४) प्रस्तुत संशोधन हे समस्यानिराकरण कार्यनिती वापरापुरते मर्यादित आहे.

**संशोधनाची गृहितके —**

१) इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्याना त्रिकोण ही संकल्पना माहित आहे.

२) विद्यार्थी आकृतीवरुन त्रिकोणातील बाजू, कोन, शिरोबिंदू ओळखतात.

**संशोधन परिकल्पना —**

इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्याना गणित विषयातील त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म आशय अध्यापनासाठी समस्या निराकरण कार्यनिती परिणामकारक ठरते.

**शून्य परिकल्पना —**

इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्याना गणित विषयातील त्रिकोण



TRUE COPY
Principal

व त्रिकोणाचे गुणधर्म आशय अध्यापनासाठी समस्यानिराकरण कार्यनिती वापराचा विद्यार्थ्यांच्या आशय आकलनावर कोणताही परिणाम होत नाही.

**संशोधन कार्यपध्दती –**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने प्रायोगिक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. प्रस्तुत संशोधनात समस्या निराकरण कार्यनितीचा वापर केला आहे. शालेय अंतिम परिक्षेतील गुणांनुसार विद्यार्थ्याचे प्रायोगिक गट व नियंत्रित गटात विभागणी करुन प्रायोगिक गटाला समस्या निराकरण कार्यनितीचा वापर करुन अध्यापन केले. यासाठी १५ विदयार्थ्यांमधील विद्यार्थ्यांचे तीन विदयार्थ्यांचा एक गट याप्रमाणे तीन गट केले व गटानुसार विद्यार्थ्याना कार्यपत्रक तयार करुन दिले व त्या कार्यपत्रकातील सूचनांनुसार कृती करण्यास सांगितली व उदाहरणे सोडवून घेतली. प्रत्येक गटातील एका विद्यार्थ्याला फलकावर उदाहरण सोडवून इतर विदयार्थ्याना समजावून देण्यास सांगितले. व शंकांचे निरसन शिक्षक व गट प्रमुख यांनी केले. तीन विद्यार्थ्यानी आपआपल्या गटात काम करताना एकमेकांशी चर्चा करणे, पूर्वज्ञानाचा वापर करणे, शंकांचे समाधान करुन घेणे व अंतिम उत्तराची खात्री करुन घेणे हे अभिप्रेत होते त्याप्रमाणे काम करुन घेतले.

**समस्या निराकरण कार्यनिती–**

समस्या निराकरण म्हणजे समस्येच्या निरसना पर्यत पोहोचण्याची सविस्तर प्रक्रिया होय. 'पोलयो' यांच्या मते, समस्या निराकरण कार्यनितीच्या चार पाय–या आहेत. त्या पुढीलप्रमाणे–

**समस्यानिराकरण कार्यनितीच्या पाय–या**

१) समस्या समजून घेणे (Understand the problem)

२) नियोजनाची विभागणी (Devise a Plan)

३) नियोजनाची अंमलबजावणी करणे (Carrying out the plan)

४) सिंहावलोकन (Looking back)

प्रस्तुत कार्यनिती वापरताना कार्यपत्रकाचा वापर केला तो पुढीलप्रमाणे.

कार्यपत्रक क्र. – १

इयत्ता – शाळा

विषय – जोडीतील विद्यार्थ्यांची नावे

घटक –

वेळ –

१)

२)

३)

सूचना – विद्यार्थ्यांने कार्यपत्रक कशाप्रकारे वापरावे याची सूचना देणे.

| विद्यार्थी 1 | विदयार्थी 2 | विदयार्थी 3 | तिघे मिळू चर्चा करणे | उत्तराबाबत सहमती व सादरीकरण |
|---|---|---|---|---|
| कार्यक्रमांक 1 आशय व विद्यार्थ्यांनी कृती कशी करावी यासाठीच्या सूचना | कार्यक्रमांक 1 आशय व विद्यार्थ्यांनी कृती कशी करावी यासाठीच्या सूचना | कार्यक्रमांक 1 आशय व विद्यार्थ्यांनी कृती कशी करावी यासाठीच्या सूचना | चर्चा व नोंदी करुन उत्तराबाबत एकमत करणे | एक विदयार्थी फलकाजवळ येऊन सादरीकरण करणे. |

प्रायोगिक पध्दतीनुसार संशोधन कार्यपध्द्तीचा ओघतक्ता

संशोधनाचा ओघतक्ता




**प्रायोगिक अभिकल्प –**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने समानगट अभिकल्पाचा वापर केला आहे.




**संशोधन नमुना निवड–**

संशोधिकेने प्रस्तुत संशोधनासाठी सहेतुक नमुना निवड पध्दतीचा वापर केला आहे. शाहू कुमार भवन शाळेतील इयत्ता सहावीच्या वर्गातील एकूण ३०

विद्यार्थ्यांची निवड केली. शालेय सत्र परीक्षेतील गुणांनुसार त्यांचे दोन गटात विभाजन केले.




जनसंख्या = ३०, एकूण विद्यार्थी = ३० न्यादर्शाचा आकार १०० %

**संशोधनाची साधने –**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने पुढील संशोधन साधनांचा वापर केला आहे.

१) उत्तर चाचणी – (संशोधिकानिर्मित)

**संख्याशास्त्रीय साधने –**

१) मध्यमान २) प्रमाण विचलन ३) 'ज' जमेज

उद्दिष्टानुसार संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

उद्दिष्ट क्र. १,२,३ नुसार

उद्दिष्ट क्र. १ इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्याना गणित विषयातील 'त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म 'आशयाचे पारंपरिक पध्दतीने अध्यापन करणे.

उद्दिष्ट क्र. २ इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्याना गणित विषयातील 'त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म 'आशयाचे समस्या निराकरण कार्यनितीचा वापरु करुन अध्यापन करणे.

उद्दिष्ट क्र. ३ इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्याना गणित विषयातील 'त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म 'आशय अध्यापनासाठी वापरलेल्या पारंपरिक व समस्यानिराकरण कार्यनितीच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष –**

१) इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्याना गणित विषयातील 'त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म' आशयाचे पारंपरिक पध्दतीने अध्यापन करणे.

२) इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्याना गणित विषयातील 'त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म' आशयाचे समस्या निराकरण कार्यनितीचा वापरु करुनअध्यापन करणे.

३) इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्याना गणित विषयातील 'त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म' आशय अध्यापनासाठी वापरलेल्या पारंपरिक व समस्यानिराकरण कार्यनितीच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

इयत्ता सहावीच्या विदयार्थ्यांमध्ये 'त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म' आशयासाठी समस्यानिराकरण कार्यनितीच्या परिणाम कारकतेचे संख्याशास्त्रीय प्रमाण

| | प्रायोगिक गट | नियंत्रित गट |
|---|---|---|
| मध्यमान | 24.6 | 13.633 |
| प्रमाणविचलन. | 4.6014 | 5.6004 |
| 't' test | प्राप्त 't' = 8.147<br>0.05 स्तरावर df = 29 | प्रमाण 't' = 2.04 |

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अर्थ निघतो की, इयत्ता सहावीच्या नियंत्रित गटापेक्षा प्रायोगिक गटाचे मध्यमान (Mc=13-633, ME =24-6) अधिक आहे व प्रमाणविचलन (S- DE =4-6014 SDC = 5-6004) वरुन नियंत्रित गटामधील गुणांमध्ये विविधता /कमी जास्तपणा दिसून येतो. (variation) तर प्रायोगिक गटामधील गुणांमध्ये (variation) कमी जास्त पणा कमी दिसून येतो. स्वाधिनता मात्रा २९ (df) ०.०५ स्तरावर प्राप्त 'ज' चे ८.१४७ आहे व नमुना 'ज २.०४ आहे. प्राप्त 'ज' हा नमुना (ज) पेक्षा मोठा असल्याने तो सार्थ आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

**निष्कर्ष –**

इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना गणित विषयातील त्रिकोण व त्रिकोणाचे गुणधर्म आशय अध्यापनासाठी समस्यानिराकरण कार्यनीती परिणामकारक आहे.

**शिफारशी –**

संशोधनाच्या निष्कर्षावरुन संशोधिकेने पुढील शिफारशी मांडल्या आहेत.

१) प्राथमिक, माध्यमिक स्तरावरील शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यनितींचा वापर करावा. उदा समस्यानिराकरण कार्यनिती, जिगसॉ कार्यनिती इ.

२) शिक्षकांनी कार्यनीती वापरासाठी वेळ अधिक लागत असल्याने तासिकांचे योग्य नियोजन करुन गणित अध्यापनासाठी विविध कार्यनितींचा वापर करावा.

३) गणित अध्यापनासाठी विविध शैक्षणिक साधने क्लृप्त्या, तक्ता, विविध प्रकारचे फलक, संगणक, भौमितीक साधने इ. साधने वापरावीत.

४) शिक्षकांनी अद्ययावत ज्ञान घेण्यासाठी चर्चासत्रे, संमेलने, सेमिनार यांना हजर रहावे व ज्ञान वृद्धीगंत करावे.

५) शिक्षक कार्यनितीचा वापर करताना जागा भरपूर लागते तेव्हा संस्थाचालक, मुख्याध्यापक यांनी त्यांना जागेची उपलब्धता (वर्गसुविधा) करुन देऊन सहकार्य करावे.

६) पालकांनी शाळेमध्ये वापरल्या जाणा—या विविध अध्यापन पध्दती, कार्यनीती समजून घेऊन स्वत :च्या पाल्यांना मार्गदर्शन करुन सराव करुन घ्यावा.

संदर्भसूची

आगाशे, ललिता (१४ नोव्हें २०१०) सहकार्यात्मक अध्ययन: गट अध्यापन पुणे : विद्यार्थी गृह प्रकाशन

Best, J. W (2007) Research in Education Englewood clifts N. J prentice Hall.

Kothari, C. R ( 2005 ) Research methodology New age , International ( p) Limited, publishers. Ansari Road , Daryaganj, New Delhi.

Kagaon, spencer (1999) Dr. spencer Kagan's Thoughts on cooperative Learning Retrieved on 28 Feb 2022

Marjorie Montague (2003 ) Math problem solving for middle school students with disabilities Retrieved on 28 feb 2022

❑❑❑

31

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण—२०२० आणि समावेशित शिक्षण

डॉ. नवनाथ. ज्ञानदेव इंदलकर
सहयोगी प्राध्यापक,
श्रीमती पुतळाबेन शाह कॉलेज ऑफ एज्युकेशन,
सांगली

**********

प्रस्तावना—

प्रत्येक बालकाला शिक्षण घेण्याचा मुलभूत हक्क बायकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम—२००५ नुसार प्राप्त झाला आहे.समाजाच्या सर्व स्तरापर्यंत शिक्षणाची व्यवस्था उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्याची आहे. प्रत्येक व्यक्तीस किमान मुलभूत प्राथमिक शिक्षण दिले गेले पाहिजे. हे शिक्षण त्याला विना अडथळा पूर्ण करण्याची सोय उपलब्ध करून दिली पाहिजे. सर्व शिक्षा अभियानात 'सर्वासाठी शिक्षण' यावर भर देण्यात आला. यातूनच समाजातील वंचित घटकांच्या चिक्षणासाठी विशेष प्रयत्न सुरू झाले. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी सुरु झालेली ही मोहिम अधिक प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता आहे. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये अद्याप अनेक घटक शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहेत .त्यांना या प्रवाहात आणण्यास राष्ट्रीय शैक्षणिक धोरण — २०२० मध्ये प्रभावी उपाययोजना सूचविण्यात आलेल्या आहेत.

मुख्य शब्द — सर्व शिक्षा अभियान, समावेशित शिक्षण, अधिनियम,स्थलांतरीत मुले, आकांक्षित जिल्हे.

समावेशित शिक्षण म्हणजे शिक्षणाच्या मुख्य प्रवादापासून दूर असणाऱ्या सर्व घटकांना या शिक्षण प्रवाहात आणणे होय. शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून बाहेर असणारे घटक म्हणजे, मुली, आर्थिक मागासलेले लोक, तृतीयपंथी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, अअल्पसंख्यांक, दुर्गम

TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209

UGC CARE JOURNAL
ISSN : 0974-0066

276

# 83

January-June 2023
Vol. 83, No. 04

TRUE COPY

Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur

IC. Principal
Acharya Jawadekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur.

# मध्य भारती

मानविकी एवं समाजविज्ञान की शोध-पत्रिका

# मध्य भारती (MADHYA BHARTI)

मानविकी एवं समाजविज्ञान की शोध-पत्रिका

अंक - 83, क्र. 04, जनवरी-जून:2023

ISSN: 0974-0066 (पूर्व-समीक्षित अर्धवार्षिक शोध-पत्रिका)

डॉ. हरिसिंग गौर विश्वविद्यालय, सागर

UGC CARE - Group I (Multidisciplinary Journal)
(Print Only)

प्रकाशित रचनाओं के अभिमत से डॉ. हरिसिंग गौर विश्वविद्यालय, सागर या संपादकों की सहमती अनिवार्य नहीं है तथा यहाँ प्रकाशित आलेखों की प्लेगारिजम (Plagiarism) संबंधी शुचिता की ज़िम्मेदारी लेखकों की है|

सम्पादकीय पत्र व्यवहार
मध्य भारती
डॉ. हरिसिंग गौर विश्वविद्यालय
सागर (म.प्र.)-470003
ई-मेल: madhyabharti2016@gmail.com

आवरण: डॉ. छबील मेहर

मुद्रण
तेजस मोमेंटो हाउस
सरस्वती वाचनालय, गौर मूर्ति, तीनबत्ती
सागर - 470002



TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
...oti, Dist-Kolhapur 416260

277

# मध्य भारती

## (MADHYA BHARTI)

## Humanities and Social Science Journal

ISSN No. 0974-0066

UGC CARE (Group I) Journal

**(Volume 83, No. 04, January-June: 2023)**

**Editor in Chief**

Prof. (Dr.) Ambikaadas Sharma

**Editor**

Prof. Bhawatosh Indrguru

Prof. Brijesh Srivastava

Dr. Aashutosh Mishra

**Volume Editor**

Dr. Chhabil Mehar

**Dr. Harising Gaur University**

**Sagar (MP) - 470003**

Email – madhyabharti2016@gmail.com

# अनुक्रमणिका

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० आणि बदलते तंत्रज्ञान ..........01
नयना मच्छिंद्र औताडे

राष्ट्रीय शिक्षण धोरण- 2020 मधील भविष्योंमुखी दृष्टिकोन ..........04
डॉ. सचिन मच्छिंद्र भोसले

प्रारंभिक बाल्यावस्था आणि शिक्षण ..........07
डॉ. प्रभाकर बुधारम

नवीन शैक्षणिक धोरण आणि आव्हाने ..........09
डॉ. बबन आमले

भारतातील शैक्षणिक आयोग : एक आढावा ..........11
डॉ. लोकेशकुमार एच. नंदेश्वर

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये 'आदर्श-गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांची शाळा' निर्मितीत शालेय समित्यांचे स्थान ..........17
रामदास सोमा तळपे/डॉ. विद्या जाधव

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत शालेय योजनांचे महत्त्व ..........21
प्रकाश तुकाराम चव्हाण/डॉ. कैलास आर. खोंडे

बहुसांस्कृतिक वर्गातील विद्यार्थ्यांशी आंतरक्रिया करताना शिक्षकांची भूमिका ..........26
डॉ परमेश्वर अभंगराव पाटील

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार मूल्यांकनाची बदलती भूमिका - एक अभ्यास ..........30
डॉ. रविराज फुरडे

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० विषयक जागरूकतेचा अभ्यास ..........33
डॉ. शिवप्रसाद चंद्रकांत घालमे

2020 राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - अध्यापक शिक्षण अंमलबजावणीतील आव्हाने ..........38
डॉ. संध्या लक्ष्मण भंगाळे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि भारतातील पूर्वीचे शैक्षणिक धोरणे ..........41
योगेश नामदेव बोचरे/डॉ. हेमंतकुमार चित्ते

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील मूल्यमापन शिफारशीनुसार सद्यस्थितीतील आकारिक मूल्यमापन साधनांची पडताळणी : एक अभ्यास ..........46
ज्योती मधुकर पाटील/डॉ. विद्या नामदेव जाधव

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अध्ययन स्तर, अध्ययन निष्पत्ती व २१ व्या शतकातील कौशल्ये ..........51
संग्राम पद्माकर शिरसाट/डॉ. सुचेता संकपाळ

स्वयंसेवी संस्थांच्या योगदानातून प्रौढांमधील कार्यात्मक साक्षरता विकसन आणि त्याची राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शी सांगड ..........54
डॉ. संजीवनी राजेश महाले

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 विषयक जाणीव जागृतीचा अभ्यास ..........59
निलीमा चौधरी/डॉ. मनिषा चौधरी

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळासाठी शैक्षणिक समुपदेशन करणाऱ्या शिक्षकांच्या सक्षमीकरणासाठीसर्वेक्षण : एक अभ्यास ..........65
भावना पाटीलबुवा राजनोर/डॉ. संजीवनी राजेश महाले

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - 2020 शालेय शिक्षणाच्या गुणवत्ता विकासाचे महाद्वार ..........71
श्रीम. ज्योती दिनकर मेस्त्री/डॉ. चंद्रकांत बोरसे

बालसंगोपन व बालशिक्षणात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची भूमिका ..........76
श्रीम. विमल अंकुश कोळी/डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये समान आणि सर्वसमावेशक शिक्षणाचा धोरणात्मक दृष्टीकोन ..........79
प्रा. जया बापू सुर्यवंशी

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि भारतातील पूर्वीचे शैक्षणिक धोरण ..........83
संजना संजय भालकर/डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०: प्राथमिक शिक्षकांचा दृष्टीकोन - एक अभ्यास ..........88
मंगेश मधुकर मोरे/डॉ. महादेव सदाशिव डिसले

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020- एक दृष्टीक्षेप ..........93
डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई

मध्य भारती (Madhya Bharti)
मानविकी एवं समाजविज्ञान की शोध-पत्रिका
UGC CARE (Group I) Journal
ISSN: 0974-0066

279

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020- एक दृष्टीक्षेप

**डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई**, सहयोगी प्राध्यापक, आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी

**सारांश**

शिक्षणात अमूलाग्र बदल करण्याची ताकद आहे. या शतकातील शाश्वत विकास, ध्येय प्राप्त करणे शक्य होईल अशी समर्थ, सशक्त शैक्षणिक व्यवस्था उभारणे हे या धोरणाचे उदिष्ट आहे. नव्या राष्ट्रीय शेक्षणिक धोरणातून सर्जनशील विचार, चिकित्सक विचार, संभाषण कला, सहकार्य, सहवेदना आणि आत्मविश्वास या कौशल्यांवर विशेषत्वाने लक्ष दिले जाणार आहे. *NEP2020* शैक्षणिक धोरणान्वये शैक्षणिक व्यवस्था व संस्था यांच्या करीता मुलभूत तत्वे निश्चित करण्यात आली आहेत. भारतीय मूल्ये जोपासणे, अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत कर्तव्ये, संविधानिक मूल्ये तसेच देशाशी असलेले बंध तयार करणे हे या धोरणातून अपेक्षित आहे. *NEP2020* च्या दृष्टीचा अभ्यास व्हावा या हेतूने संशोधिकेने प्रस्तूत संशोधन विषय निवडला आहे.

**मुख्य संबोध -** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण *2020*, दृष्टीक्षेप

**प्रस्तावना**

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 हे 21 व्या शतकातील पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आहे. NEP2020, 29 जुलै 2020 रोजी मंजूर करण्यात आले. या धोरणामध्ये अनेक अमूलाग्र बदल करण्यात आले आहेत. 'केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय' आता 'शिक्षण मंत्रालय' या नावाने ओळखण्यात येणार आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर येथील निरक्षरता दूर करण्यासाठी सातत्याने वेगवेगळे कार्यक्रम आखले जात आहेत. यामध्ये प्रथम विविध शिक्षण आयोग नेमण्यात आले. 1948 चा राधाकृष्णन आयोग, 1952-54 चा मुदालियार आयोग, 1964-66 चा कोठारी आयोग, त्यानंतर पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968 मध्ये लागू करण्यात आले. त्यानंतर दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 मध्ये लागू करण्यात आले. 1992 मध्ये या धोरणात काही प्रमाणात बदल करण्यात आला. 2009 मध्ये मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम RTE Act 2009 संमत केला गेला. या कायद्याने प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षणाचा अधिकार मिळाला त्यानंतर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण निश्चित करण्यासाठी अभ्यासगट स्थापन करण्यात आला. यामध्ये सर्वप्रथम 31 ऑक्टोबर 2015 मध्ये टी.एस.आर. सुब्रमण्यम 5 सदस्यीय समिती गठित करण्यात आली होती. एस.आर. सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण निश्चित करण्या संदर्भात समिती गठित करण्यात आली होती. या समितीने 27 मे 2016 रोजी आपला अहवाल सादर केला. त्यानंतर 24 जून 2017 मध्ये डॉ.के.कस्तूरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली 9 सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली. मानव संशोधन मंत्रालयाला मे 2019 मध्ये अहवाल सादर केला. 31 मे 2019 मध्ये रमेश पोखरियाले आयोग नेमण्यात आला होता. तेव्हा ते मानव संसाधन मंत्री होते. हा अहवाल अभ्यासून लोकांची मते मागविली होती. जवळपास 2 लाख लोकांनी या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अहवालावर आपली मते नोंदविली होती. अशा या NEP2020 मध्ये नेमके काय आहे? याचा अभ्यास करण्याच्या हेतूने संशोधिकेने संशोधनासाठी प्रस्तूत विषय निवडला आहे.

**संशोधनाची उदिष्टे-**

संशोधिकेने संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे मांडली आहेत.

1. NEP2020 च्या उद्देशाचा व तत्वांचा अभ्यास करणे.
2. NEP2020 च्या संरचनेचा अभ्यास करणे.
3. NEP2020 धोरणाचा आढाव घेणे.

**संशोधनाचे महत्व-**

1. NEP2020 वर दृष्टीक्षेप टाकला असता या धोरणांची उद्दिष्टे समजण्यासाठी प्रस्तूत संशोधन महत्वाचे आहे.
2. NEP2020 मधील शालेय शिक्षण, उच्चशिक्षण, शिक्षक शिक्षण, पेशाविषयक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, नॅशनल रिसर्च फाऊंडेशन, शिक्षणामध्ये तंत्रज्ञान, प्रौढशिक्षण, भारतीय भाषांना चालना इत्यादी बाबत सविस्तर माहिती मिळण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.



TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education

**संशोधनाची परिमर्यादा-**

1. प्रस्तूत संशोधन हे NEP2020 मधील उच्चशिक्षण, व्यावसायिक शिक्षण व शिक्षक शिक्षण या अभ्यासक्रमापुरते मर्यादीत आहे.

**विश्लेषणात्मक विषयाविवेचन**

NEP 2020 मसुद्यासाठीच्या स्थापित समितीचे अध्यक्ष के. कस्तूरीरंगन होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण2020 भारताला केंद्रस्थानी मानून अशा शिक्षणप्रणालीची कल्पना करते की, जी सर्वांना उच्च दर्जांचे शिक्षण प्रदान करून आपल्या राष्ट्राला सातत्याने न्याय्य व चैतन्यमय ज्ञानी समाजमध्ये परिवर्तित करण्यात थेट योगदान देते.

**NEP2020 चा उद्देश**

1. NEP2020 चा मुख्य उद्देश हा आहे की, शास्वत विकासासाठी समर्थ व सशक्त शैक्षणिक व्यवस्था उभारणे.

2 भारताला जागतिक स्तरावर ज्ञानाच्या बाबतीत सुपर पॉपर बनवणे.

**NEP2020 चीतत्त्वे-**

| | |
|---|---|
| NEP 2020 तत्त्वे | नैतिकवमूल्यविकास |
| | बहुभाषित्वप्रोत्साहन |
| | विद्यार्थीक्षमताओळखूनत्यांच्याविकसनासाठीप्रयत्न |
| | अभ्यास-अभ्यासेतरक्षेत्रालाचालना |
| | मुलभूतसाक्षरतावसंख्याज्ञान - प्राधान्य |
| | अध्ययनमार्गनिवडण्यासाठीचीलवचिकता |
| | विज्ञान, समाजशास्त्र, कला, मानसशास्त्रे, खेळ- बहुशाखीयबसमग्रशिक्षणाचाविकास |
| | संकल्पनासमजूनघेण्यावरभर |
| | कल्पकताआणितार्किकविचार |
| | सातत्यपूर्णमूल्यांकनावरभर |
| | तंत्रज्ञानाचापुरेपूरवापर |
| | दिव्यांगासाठीशैक्षणिकनियोजनवव्यवस्थापन |
| | सर्वशैक्षणिकनिर्णयांमध्येपूर्णसमानतावसर्वसमावेशकता |
| | बालसंगोपनबालशिक्षणापासूनशालेय, उच्चशिक्षणाच्याअभ्यासक्रमातसुसूत्रता. |
| | शिक्षकप्राध्यापकभरती, सातत्यपूर्णव्यावसायिकविकास |
| | शिक्षणप्रणालीतएकसुलभपणपरीणामकारकनियमांचीचौकटदेणे |
| | गुणवत्तापूर्णशिक्षणासाठीसंशोधन |
| | शिक्षणातीलसातत्यपूर्णप्रगतीचाआढावा |
| | शिक्षणहाबालकाचाहक्क |
| | संस्थांच्याभागीदारीलाप्रोत्साहनवसुविधा |

**NEP2020 संरचना**

सध्याच्या शालेय शिक्षणाचा आकृतीबंध 10+2+3 आहे. NEP2020 नुसार 5+3+3+4 अशी नवीन अध्यापन शास्त्रांची अभ्यासक्रमाची पुनर्रचना केली आहे.

पहिली पाच वर्षे – पूर्व प्राथमिक, त्यांनंतर दोन वर्षे पहिली व दुसरी
पुढील तीन वर्षे – 3 री ते 5 वी
पुढील तीन वर्षे – सहावी ते आठवी

**अखेरची चार वर्षे – नववी ते बारावी**

अशा 15 वर्षामध्ये शालेय शिक्षण विभागण्यात आले आहे.

**NEP2020 नुसार विद्यार्थी वयोगट पुढील प्रमाणे**

**मूलभूत शिक्षण –**

1. नर्सरी वयोगट - 4 वर्षे

ISSN: 0974-0066

2. ज्युनिअर के.जी - 5 वर्षे
3. एस, आर. के.जी - 6 वर्षे
4. इयत्ता पहिली - 7 वर्षे
5. इयत्ता दुसरी - 8 वर्षे

**पुढील 3 वर्षे – प्रारंभिक शाळा**

6. इयत्ता 3 री - 9 वर्षे
7. इयत्ता 4 थी - 10 वर्षे
8. इयत्ता 5 वी - 11 वर्षे

**पुढील 3 वर्षे माध्यमिक शाळा (Middle)**

9. इयत्ता 6 वी - 12 वर्षे
10. इयत्ता 7 वी - 13 वर्षे
11. इयत्ता 8 वी - 14 वर्षे

**पुढील 4 वर्षे माधमिक शाळा (Secondary)**

12. इयत्ता 9 वी - 15 वर्षे
13. इयत्ता 10 वी - 16 वर्षे
14. F.Y.J.C - 17 वर्षे
15. S.Y.J.C - 18 वर्षे

अशाप्रकारे NEP2020 मधील स्तर संरचना आहे.

**NEP2020 धोरणाचा आढावा**

**उच्चशिक्षण -**

**NEP2020 धोरणामध्ये उच्च शिक्षणात पुढील प्रमाणे बदल आहेत.**




**शिक्षक शिक्षण**

बहुविध शाखांनी सुसज्ज असलेल्या या उच्चशिक्षण संस्थांमध्ये स्तरानुसार व विषयावर राबविण्यात येणारा व एकीकरण केलेला 4 वर्षाचा बॅचलर ऑफ एज्युकेशन हा अभ्यासक्रम पूर्ण करुन पदवी प्राप्त करता येईल.

दुय्यम दर्जाच्या व अकार्यक्षम शिक्षक शिक्षण संस्था बंद करण्यात येतील.

शिक्षक शिक्षणात असा बदल केला आहे.

1. 12 वी नंतर चार वर्षांचा बी.ए.बी.एड / बी.एस्सी.बी.एड अभ्यासक्रम आहे.
2. पदवी नंतर दोन वर्षांचा बी.एड.कोर्स 2023 पर्यंत कोर्स सुरू राहील.
3. पदव्युत्तर पदवी नंतरचा एक वर्षांचा बी.एड.कोर्स असेल.

**व्यावसायिक शिक्षण-**

व्यावसायिक शिक्षण सर्व प्रकारच्या शिक्षणाचा अविभाज्य घटक असेल. सन 2025 पर्यंत सर्व शिकाऊ विद्यार्थ्यांपैकी किमान 50% विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाचा लाभ मिळावा हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

**निष्कर्ष**

उद्दिष्ट क्र.1,2,3, नुसार

1. NEP2020 च्या उद्देशाचा व तत्त्वांचा अभ्यास करणे.
2. NEP2020 च्या संरचनेचा अभ्यास करणे.
3. NEP2020 धोरणाचा आढावा घेणे.

**निष्कर्ष**

1. NEP2020 चा मुख्य उद्देश भारतामध्ये समर्थ, सशक्त शैक्षणिक व्यवस्था उभारणे हा आहे.
2. NEP2020 मध्ये 5+3+3+4 ही शैक्षणिकस्तर संरचना आहे.
3. NEP2020 मध्ये प्रर्व प्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंतची शिक्षणप्रणाली सविस्तर दिली आहे.

**संदर्भ**

1. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 शिक्षण मंत्रालय भारत सरकार
2. Best, J. W (2007) Research in Education Englewood clifts N. J prentice Hall
3. Kothari, C. R ( 2005 ) Research methodology New age , International ( p) Limited, publishers. Ansari Road , Daryaganj, New Delhi.
4. Weblink-
5. https://wwwshikhanmitra.com
6. https://www.education.gov.in.

TRUE COPY

Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209

मध्य भारती (Madhya Bharti)
मानविकी एवं समाजविज्ञान की शोध-पत्रिका

UGC CARE (Group I) Journal
ISSN: 0974-0066

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि भारतातील पूर्वीचे शैक्षणिक धोरण

संजना संजय भालकर, संशोधक विद्यार्थी
डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई, सहयोगी प्राध्यापक, आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी

**सारांश**

मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी,समान आणि न्याय समाज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे.भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी अणि आर्थिक विकास,सामाजिक न्याय अणि समानता,शास्त्रीय प्रगती,राष्ट्रीय एकात्मता व संस्कृतीचे जतन या क्षेत्रांमध्ये वैश्विक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे महत्वाचे आहे. व्यक्ती,समाज,देश आणि जगाच्या हितासाठी आपल्या देशातील समृद्धप्रतिभा आणि संसाधनांचा पुरेपूर वापर करण्याकरिता उच्च दर्जाचे सार्वभौमिक शिक्षण हा भविष्यासाठी चांगला मार्ग आहे.पुढच्या दशकात जगातील सर्वात मोठी युवकांची लोकसंख्या भारतामध्ये असेल आणि त्या सर्वांना चांगल्या गुणवतेच्या शिक्षणाच्या संधी पुरवण्याच्या आपल्या क्षमतेवर आपल्या देशाचे भवितव्य ठरेल.ज्ञानाच्या बाबतीत जगामध्ये वेगाने बदल होत आहेत,कृत्रिम बुद्धिमत्ता,मशीन लर्निंग यासारख्या विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांमध्ये वेगाने बदल घडत आहेत.तसेच हवामान बदल बरोबर,वाढते प्रदूषण आणि कमी होणारे नैसर्गिक स्रोत या परिणामांमुळे जगाची ऊर्जेची मागणी भागविण्यासाठी आता वेगळा दृष्टिकोन अंगिकारावा लागेल.वाढते साथीचे रोग कोविड-१९ यांच्यामुळे संसर्गजन्य काळामध्येव्यवस्थापन करण्यासाठी सहयोगाने संशोधन करण्याची गरज निर्माण होईल.यासारख्या सामाजिक समस्या सोडविण्यासाठी बहुशाखीय शिक्षणाची गरज अधोरेखित करताना भारत देश,विकसित देश होण्याकडे वाटचाल करत असताना, तसेच जगातील सर्वात मोठ्या तीन अर्थव्यवस्थांपैकी एक होत असताना खरोखरच,रोजगाराची परिस्थिती आणि वैश्विक परिसंस्था वेगाने बदलत असताना,मुलांनी केवळ शिकणेच महत्वाचे ठरणार नाही.त्यामुळे पुस्तकी मजकूर कमी करून तार्किक विचार कसा करावयाचा?आणि समस्या कश्या सोडवायच्या?कल्पक आणि बहुशाखीय कसे व्हायचे?नावीन्यपूर्णता कशी आणायची?बदलत्या परिस्थितीशी जुळवून कसे घ्यायचे?आणि बदलणाऱ्या क्षेत्रातील नवीन सामग्री कशाप्रकारे आत्मसात करायची?या दिशेला वळविण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि भारतातील पूर्वीची शैक्षणिक धोरणे यावर विचार मंथन करण्याच्या हेतूने संशोधिकेने प्रस्तुत विषयाची निवड केली आहे .

**मुख्य संबोध:** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

**प्रस्तावना**

मानवी इतिहासाच्या प्रारंभापासून ते आजपर्यंत आपली सामाजिक व सांस्कृतिक विरासत जपण्यासाठी आणि येणाऱ्या समस्यांना तोंड देण्यासाठी देशाने एक स्वतःची शिक्षणव्यवस्था विकसित केली आहे. परंतु परंपरागत अशा व्यवस्थांना छेद देऊन नवीन व्यवस्था प्रस्थापित करण्याची वेळ प्रत्येक देशाला येते आणि आज आपण त्या अवस्थेत आहोत.आर्थिक आणि तांत्रिक क्षेत्रामधील प्रगतीमुळे भारत आज अशा वळणावर येऊन ठेपला आहे की,या नवीन साधनांचा वापर करून प्रत्येक वर्गाला लाभान्वित करण्यासाठी माध्यम म्हणून शिक्षणाचा जास्तीत जास्त वापर व्हावा,या उद्देशाच्या परिपूर्तीसाठीच राष्ट्रीय पातळीवर विचार मंथन होऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा उदय झाला.National Policy On Education (NPE) हे भारतातील शिक्षणाचा प्रसार आणि नियमन करण्यासाठी भारत सरकारने तयार केलेले धोरण आहे.या धोरणात ग्रामीण आणि शहरी भारतातील प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षणाचा समावेश आहे.पहिला NPE भारत सरकारने १९६८ मध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी,दुसरा पंतप्रधान राजीव गांधी यांनी १९८६ मध्ये आणि तिसरा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२० मध्ये जाहीर केला.१९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून,भारत सरकारने ग्रामीण आणि शहरी दोन्ही भारतातील निरक्षरतेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विविध कार्यक्रम प्रायोजित केले.भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांनी शैक्षणिक प्रणालीसह संपूर्ण देशभरातील शिक्षणावर केंद्र सरकारच्या मजबूत नियंत्रणाची कल्पना केली.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :-प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे**

१.भारतातील NPE२०२०पूर्वीचे शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करणे.
२.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अभ्यास करणे.



TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur

UGC CARE (Group I) Journal
ISSN: 0974-0066

**प्रस्तुत संशोधनाचे महत्व**

प्रस्तुत संशोधन हे उच्चं प्राथमिक व माध्यमिक शालेय स्तरावरील समस्यांचे निराकरण होण्यासाठी महत्वपूर्ण ठरेल व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची माहिती मिळविण्यासाठी उपयुक्त ठरेल.

**संशोधनाची परिमर्यादा**

प्रस्तुत संशोधन हे शैक्षणिक धोरण २०२० आणि भारतातील पूर्वीचे शैक्षणिक धोरण यामधील उच्चं प्राथमिक स्तर व माध्यमिक स्तर यापुरतेच मर्यादित राहील.

**संशोधन पध्दृती**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने दस्तऐवजांचे विश्लेषण व सर्वेक्षण संशोधन पध्दृती यांचा उपयोग केलेला आहे.

**विश्लेषणात्मक विषयविवेचन**

**विद्यापीठ शिक्षण आयोग (१९४८-१९४९)**
राधाकृष्णन आयोग म्हणून ओळखले जाते.

डॉ .सर्वपल्ली राधाकृष्णन हे अध्यक्ष होते.विद्यापीठ स्तरावरील शिक्षणासाठी हा आयोग नेमण्यात आला होता.

**माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२-१९५३)** यास मुदलियार आयोग म्हणून ओळखले जाते.

डॉ .ए .लक्ष्मणस्वामी मुसलीयार हे अध्यक्ष होते .प्रामुख्याने माध्यमिक स्तरावरील शिक्षणासाठी हा आयोग नेमण्यात आला होता.१८३५ च्या मेकॉलेच्या जाहीरनाम्यानुसार इंग्रजी साहित्य ,भाषा आणि शिक्षणाचा प्रसार भारतामध्ये सुरु झाला १८५४ च्या वुडच्या खलित्यातील शिफारशीनुसार पुढे १८५७ ला विद्यापीठांची स्थापना झाली आणि माध्यमिक शिक्षणाचा आराखडा,कालमर्यादा आणि व्याप्ती ठरविण्याची जबाबदारी विद्यापीठांवर सोपविण्यात आली .याचा परिणाम असा झाला की,माध्यमिक शिक्षणाला विद्यापीठ शिक्षणाची पूर्वतयारी असे दुय्यम स्थान प्राप्त झाले .पुढे १९४९ मध्ये केंद्रीय सल्लागार मंडळाने अलाहाबाद येथील बैठकीत विचार करून निश्चित केले की डॉ .ताराचंद कमिटीचे म्हणणे आणि माध्यमिक शिक्षणाच्या परिपूर्ती साठी माध्यमिक शिक्षण आयोग नियुक्त करावा पुढे २३ सप्टेंबर १९५२ मध्ये माध्यमिक शिक्षण आयोग चेन्नई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ .ए .लक्ष्मणस्वामी मुसलीयार यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आला होता.

**माध्यमिक शिक्षण आयोग वैशिट्ये**

१ माध्यमिक शिक्षणाचे ध्येय लोकशाही नागरिकत्वाचा विकास करणे.
२ विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कार्यक्षमता विकसित करणे.
३ विद्यार्थ्यांच्या शारीरिक ,मानसिक ,बौद्धिक ,सामाजिक ,सांस्कृतिक ,कलात्मक इ क्षेत्रामध्ये व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करणे.
४ माध्यमिक स्तरावर शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी ,उच्चं माध्यमिक स्तरावर किमान दोन भाषांमध्ये अध्यापन व्हावे.

शिक्षणाच्या इतिहासात माध्यमिक शिक्षणाचा सर्वांगीण विचार करून मौलिक अशा शिफारशी करणारा हा पहिलाच प्रयोग आहे.माध्यमिक शिक्षणाचाप्रथम झाला असे म्हणणे योग्य होईल .

**शिक्षण आयोग** १९६४ -६६ (कोठारी आयोग या नावानेही ओळखले जाते)

**अध्यक्ष प्रा.डी.एस.कोठारी हे होते.**

प्राथमिक ,माध्यमिक आणि उच्चं माध्यमिक शिक्षणावर स्वतंत्रपणे विचार करण्याऐवजी त्यांचा एकत्रित होणे गरजेचे आहे .या साठी शासनाने शिक्षणाचा सर्वांगीण विचार करण्यासाठी कोठारी आयोगाची नियुक्ती केली.

**कोठारी आयोगाची वैशिट्ये**

१. कार्यानुभवाच्या माध्यमातून तंत्रज्ञान ,औद्यगिकरण आणि शेतीसह सर्व क्षेत्रांमध्ये विज्ञानाचा वापर व्हावा.
२. सामाजिक आणि राष्ट्रीय सेवा हि सर्व विद्यार्थ्यांना सर्व स्तरावर बंधनकारक करण्यात आले.
३. शालेय शिक्षणाचे माध्यम मातृभाषा होते तर उच्चं शिक्षणाचे माध्यम सामान्यत:प्रादेशिक भाषा होते.
४. इंग्रजी भाषेचे शिक्षण सुरुवातीपासून द्यावे ,आंतरराष्ट्रीय संपर्कासाठी इंग्रजी येणे आवश्यक .
५. गळती व स्थगिती साठी अर्धवेळ शाळा व प्रौढ साक्षरता वर्ग सुरु केले गेले होते.
६. १९६८ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे कोठारी आयोगाची अंमलबजावणी आहे .कोठारी आयोग हा स्वात्रंत्योत्तर भारतीय शिक्षण प्रगतीचा मूलाधार आहे .त्याच्या आधारावर पुढील परिवर्तने घडलेली आहेत

**राष्ट्रीय शिक्षण धोरण (१९६८)**

**अध्यक्ष -त्रिगुण सेन हे होते**

राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८ कोठारी आयोगाच्या शिफारशींवर आधारित होते आणि त्यात कोठारी आयोगाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र आणि राज्य सरकार आणि प्राधिकरणांना मार्गदर्शन जारी करण्याची शिफारस करण्यात आली होती

**NPE १९६८ ची प्रमुख वैशिष्ट्ये :-**

१. मोफत आणि सक्तीचे शिक्षण-कलम-४५ (भारतीय संविधान)नुसार वयाच्या १४ व्या वर्षापर्यंत शिक्षण मोफत आणि सक्तीचे असले पाहिजे .आणि शिक्षणाचा दर्जा सुधारण्यावर अधिक भर दिला पाहिजे .

२.भाषा विकास- या धोरणात भारतीय तसेच परदेशी भाषांच्या विकासावर भर देण्यात आला होता .

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्याला हिंदी,इंग्रजी आणि त्यांच्या राज्याच्या प्रादेशिक भाषा अवगत असावी,असे तीन भाषांचे (त्रिभाषा)सूत्र सादर करावे .

माध्यमिक स्तरावर ऐच्छिक विषय म्हणून संस्कृत भाषेचा समावेश करण्यात आला.

३.सर्वांना शिक्षणाची संधी :-या धोरणाअंतर्गत देशातील प्रत्येक मुलाला जात,धर्म,प्रदेश किंवा काहीही असले तरी शिक्षण मिळाले पाहिजे,मागासवर्गीय,अल्पसंख्यांक मुले,मुली आणि शारीरिक दृष्ट्या विकलांग मुलांना शिक्षणाच्या सुविधांचा लाभ घेण्यासाठी विशेष भर देण्यात आला.

४.एकसमान शैक्षणिक संरचना :-संपूर्ण देशात शिक्षणाची रचना एकसमान असावी .उच्च माध्यमिक ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत १०+२+३ नमुना असावा.

५.प्रगतीचा आढावा :-सरकारने वेळोवेळी देशातील प्रगतीचा आढावा घेऊन भविष्यातील विकासासाठी मार्गदर्शक तत्वे मांडली.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८ ची कामगिरी**

**१९६८ चे धोरण NPE-१ फारसे यशस्वी झाले नाही ,याची अनेक कारणे होती**

१. पहिली गोष्ट म्हणजे,त्यावेळी कृतींचा योग्य कार्यक्रम आणला गेला नाही.

२. दुसरे म्हणजे निधीची कमतरता,भारताची अर्थव्यवस्था डबघाईला आली होती .

३. तिसरे म्हणजे,त्यावेळी शिक्षण राज्यांच्या यादीत होते,त्यामुळे राज्ये ही योजना कशी राबवतील यावर केंद्राची भूमिका फारशी नव्हती.

**असे असूनही राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८ हे काही प्रमाणात यशस्वी झाले त्यात ,**

१. १०+२+३ शिक्षण पद्धतीचा समावेश.

२. त्रिभाषा सूत्रांचे पालन आजही बहुतेक शाळा करतात .

३. विज्ञान आणि गणिताला अधिक प्राधान्य मिळू लागले.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) :-**

**अध्यक्ष -आचार्य राममूर्ती हे होते.**

१. NPE१९८६ चे धोरण राजीव गांधी पंतप्रधान असताना जारी करण्यात आले होते आणि पी.व्ही.नरसिंह राव असताना ते १९९२ मध्ये अद्ययावत करण्यात आले होते.

२. त्याला "असमानता दूर करण्यावर आणि शिक्षणाच्या संधी समान करण्यावर विशेष भर"असे नाव देण्यात आले.

३. या धोरणाचा मुख्य उद्देश्य महिला,अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसह सर्वांना समान शिक्षणाची संधी प्रदान करणे आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ,१९८६ ची प्रमुख वैशिष्ट्ये :-**

१.शिक्षणाचे विकेंद्रीकरण आणि जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था स्थापन करणे.

२.GDP च्या ६% पर्यंत खर्च वाढवून शिक्षणासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणे.

३.देशभरातील शिक्षणाच्या १०+२+३ पॅटर्नच्या एकसमान पॅटर्नची तात्काळ अंमलबजावणी करण्याची शिफारस करण्यात आली.

४.प्राथमिक ,माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर शैक्षणिक कार्यक्रमाची पुनर्रचना तसेच शालेय अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याची शिफारस करण्यात आली.

५.बालपणीची काळजी आणि शिक्षणाला महत्व दिले गेले ,अन्न आणि आरोग्यदायी वातावरणाची योग्य उपलब्धता करण्याचीही शिफारस करण्यात आली.

६.प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मोफत आणि सक्तीचे शिक्षण.

७.भाषा,गणित,विज्ञान,सामाजिक विज्ञान,सांख्यिकी,मानविकी,इतिहास आणि नागरिकांची राष्ट्रीय आणि घटनात्मक जबाबदारी यासारख्या काही संकल्पना विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी अनिवार्य शालेय विषयांना प्राधान्य दिले जाईल.

**राष्ट्रीय धोरणाचे नाविन्यपूर्ण पैलू :-**

१. खडू ,फळ मोहीम
२. क्रीडा साहित्य आणि खेळणी
३. प्राथमिक विज्ञान संच पेटी
४. राष्ट्रीय अभ्यासक्रम
५. नवोदय विद्यालय

**NPE१९८६ ची कामगिरी :-**

१. १९६८ च्या धोरणाच्या तुलनेत १९८६ च्या धोरणाने चांगली कामगिरी केली.दुसरे म्हणजे आता केंद्र व्यापक जबाबदारी स्वीकारण्यास सक्षम आहे आणि या धोरणाच्या अनुषंगाने अनेक कार्यक्रम सुरु केले आहेत.
२. सर्व शिक्षा अभियान ,माध्यान्ह भोजन योजना ,नवोदय विद्यालय ,केंद्रीय विद्यालय आणि शिक्षणात इन्फॉर्मेशन टेकनॉलॉजि (IT) चा वापर यासारख्या उत्कृष्ट सरकारी योजना १९८६ च्या नेत अंतर्गतसुरु झाल्या होत्या.

**सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९९२) :-**

**अध्यक्ष -श्री.एन.जनार्दन रेड्डी हे होते.**

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९९२ ची वैशिष्ट्ये :-**

१. पी.व्ही.नरसिंह राव सरकारने १९९२ मध्ये १९८६ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात बदल केले.
२. नवीन विशेष शाळा उघडण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी या क्षेत्रात पुढे येण्यासाठी तरतुदी केल्या होत्या.
३. नवोदय विद्यालयाच्या शाळांमध्ये गुणवत्ता वाढीवर भर देणे आणि इतर सर्व शाळांसाठी आदर्श निर्माण करणे.
४. खेळ आणि इतर शारीरिक हालचालींवर भर देण्यात आला.विद्यार्थ्यांना एनसीसी आणि एनएसएस मध्ये सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करण्याच्या सूचना देण्यात आल्याहोत्या.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०):-**

**अध्यक्ष -कृष्णस्वामी कस्तुरीरंगन हे आहेत.**

१. केंद्रीय मंत्रिमंडळाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ला मंजुरी दिली,ज्याचा उद्देश्य भारतीय शिक्षण व्यवस्थेत शाळा ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत अनेक बदलांचा परिचय करून दिला आहे.
२. NPE२०२० चे उदिष्ठ "भारताला जागतिक ज्ञान महासत्ता "बनवणे आहे.
३. मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून "शिक्षण मंत्रालय "करण्यासाठी मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

**NPE २०२० ची प्रमुख वैष्ठ्ये :-**

**शालेय शिक्षण/School Education**

१.२०३० पर्यंत शालेय शिक्षणात १०० % सकल नोंदणी गुणोत्तर (GER) सह पूर्वस्कूल ते माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे.
२.२ कोटी शाळाबाह्य मुलांना मुक्त शाळा प्रणालीद्वारे मुख्य प्रवाहात आणणे.
३ .सध्याची १०+२+३ आहे तर नवीन प्रणाली मध्ये ५+३ +३ +4 अभ्यासक्रम संरचनेद्वारे बदलली जाईल.
४.हे ३-६ वर्षे वयोगटातील न उघडलेले शालेय अभ्यासक्रमांतर्गत आणेल, ज्याला जागतिक स्तरावर मुलांच्या मानसिक क्षमतांच्या विकासासाठी महत्त्वाचा टप्पा म्हणून ओळखले जाते.
५. यामध्ये तीन वर्षांच्या अंगणवाडी/पूर्व-शालेय शिक्षणासह १२ वर्षांचे शालेय शिक्षण देखील असेल.
६.१० वी आणि १२ वी बोर्डाच्या परीक्षा सोप्या केल्या जाव्यात, सर्व विद्यार्थ्यांना दोनदा परीक्षा देण्याची परवानगी देऊन, लक्षात ठेवलेल्या तथ्यांऐवजी मुख्य कौशल्यांची चाचणी घ्या.
७.नवीन मान्यता फ्रेमवर्क आणि सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही शाळांचे नियमन करण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरणासह, शाळा प्रशासनात बदल केले जाणार.
८.पायाभूत साक्षरता आणि संख्याशास्त्रावर भर, शाळांमधील शैक्षणिक प्रवाह, अभ्यासक्रमेतर, व्यावसायिक प्रवाह यांच्यात कोणतेही कठोर वर्गीकरण असणार नाही.
९.व्यावसायिक शिक्षण इयत्ता 6 वी पासून इंटर्नशिपसह सुरू होणार आहे. किमान इयत्ता ५ पर्यंत मातृभाषा/प्रादेशिक भाषेत शिकवणे. कोणत्याही विद्यार्थ्यावर कोणतीही भाषा लादली जाणार नाही.
१०.३६० -डिग्री होलिस्टिक प्रोग्रेस कार्डसह मूल्यांकन सुधारणा, शिकण्याचे परिणाम प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा मागोवा घेतला जाईल.

283

**इतर बदल :-**

१. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी राष्ट्रीय मूल्यमापन केंद्र -पारख (पारख) ची निर्मिती करण्यात येईल.
२. 'एक भारत श्रेष्ठ भारत 'या उपक्रमाअंतर्गत इयता सहावी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना "भारतातील भाषा " या प्रकल्पामध्ये सहभाग घेता येणार आहे .
३. भारतीय नागरिकांमध्ये शिक्षणाचा पुरस्कार करण्यासाठी भारत सरकारने आखलेले धोरण भारतातील ग्रामीण व नागरी भागातील प्राथमिक ते महाविद्यालयीन शिक्षण कसे असावे याची आखणी सदर धोरण करते.

**संशोधनाचे निष्कर्ष :-**

NPE१९६८,१९८६ व १९९२ च्या धोरणामध्ये शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण,महिला, अनुसूचित जाती,जमाती सर्वांना समानशिक्षण देणे यावर भर देण्यात आला होता.सक्तीचे मोफत शिक्षण त्याच बरोबर मध्यान्ह भोजन यांचा पाया रचला होता.परंतु NEP २०२० मध्ये या पूर्वीच्या धोरणा बरोबरच शिक्षणाचा दर्जा सुधारणे,कौशल्य विकसित करणे,बहुभाषिकत्व शिक्षण ,डिजिटल तंत्रज्ञाचा वापर ,कोविड-१९ चा प्रसार लक्षात घेऊन पर्यायी शैक्षणिक पध्द्तीचा व्यापक विचार करण्यात आलेला आहे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेस प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक दृष्ट्या शिष्यवृत्ती व विविध योजनांच्या माध्यमातून विशेष भर देण्यात आलेला आहे.

**शिफारशी :-**

१. NPE २०२० च्या अंमलबजावणीसाठी ग्रामीण,शहरी स्तरातील विद्यार्थ्यांना व शाळांना योग्य साधनसामग्रीचा पुरवठा करावा.
२.NPE २०२०चे मूल्यमापन करण्यासाठी केंद्र व राज्य स्तरावर योग्य प्रयत्नांची आवश्यकता आहे.
३.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० योग्य प्रकारे अंमलबजावणी केली जावी.

**संदर्भ :-**

१. वास्करआनंद, वास्करपुष्पा (२००८);भारतीय शिक्षणाचे बहुजनीकरणपुणे:नित्य नूतन प्रकाशन
२. सतीश पाटील (एप्रिल २०२२) ;शैक्षणिक व्यवस्थापन व प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन;निराली प्रकाशन
३. http://www.education.gov.in 29july 2020 retrived on 25 jan 2023. http://www.mr.vikaspedia
४. .in 2020retrived on 25 jan 2023.
५. http://www.esakal.com.july2020retrived on 26jan 2023.
http://www.educationalmaharashtra.com.mar2022retrived on 27jan 2023.

TRUE COPY

Principal
Aacharya Javdekar College of Education
C... , Dist. Kolhapur 416209

मध्य भारती (Madhya Bharti)
मानविकी एवं समाजविज्ञान की शोध-पत्रिका
UGC CARE (Group I) Journal
ISSN: 0974-0066

# बालसंगोपन व बालशिक्षणात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची भूमिका

श्रीम. विमल अंकुश कोळी, संशोधक विद्यार्थी, सावित्रीबाई फुले महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पेठ वडगाव
डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई, सहयोगी प्राध्यापक, आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी

**सारांश**

शिक्षण ही सातत्याने विकसित होणारी प्रणाली आहे. शाश्वत विकास कृती कार्यक्रमामधील उद्दिष्टांनुसार 'जागतिक शिक्षण विकास कृती करण्याच्या हेतूने नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण *2020* चा आराखडा तयार करण्यात आला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण परंपरा व मूल्ये, सृजनक्षमतेचा विकास, आकलनक्षमता, साक्षरता व संख्याज्ञान तार्कीक व समस्या निराकरण क्षमता, सामाजिक, नैतिक आणि भावनिक क्षमतांचा विकास अशा मुलभूत विकासावर भर देतें. राष्ट्रीय शिक्षण धोरण *2020* मध्ये प्रथमचं बालशिक्षणाचा समावेश केला आहे. लहान मुलांच्या मेंदूच्या एकंदर विकासापैकी *85%* हून अधिक विकास वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत होतो. गुणवत्तापूर्ण बाल्यावस्था पूर्व विकास संगोपन आणि पूर्वप्राथमिक शिक्षणाची सार्वत्रिक तरतुदीमुळे ही मुले आयुष्यभर शैक्षणिक व्यवस्थेत सहभाग घेण्यास व उत्कर्ष साधण्यास सक्षम बनतील. पुढील सर्व शिक्षणाला पायाभूत असणाऱ्या बालशिक्षणाचे शास्त्र समजून घेऊन धोरणातील बालसंगोपन व बालशिक्षणातील भूमिका समजून घेणे आवश्यक आहे. बालशिक्षण हा सामाजिक व्यक्तीच्या निर्मितीचा आधार आहे. तीन वर्षापर्यंतचा बालवयाचा टप्पाही प्रथमच शिक्षणाच्या अंगाने या गटाशी जोडला आहे. धोरणाच्या मसुद्यात म्हटले आहे की, 'बालसंगोपन व शिक्षण यांवरील अत्याधुनिक संशोधन आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय उत्कृष्ट *(शिक्षण)* पद्धती लक्षात घेऊनच शून्य ते तीन आणि तीन ते सहा या गटासाठी अभ्याक्रम केला जाणार आहे बालशिक्षणाचा पाया बळकटीसाठी अंगणवाडयांना प्रमुख स्थान असेल. संशोधनाने असे आढळून आले आहे की, तुलनेने गरीब, मागास मुलांना बालपणात मिळणाऱ्या विपरीत परिणाम शिक्षणावरच नाही तर आयुष्यभराच्या जीवनशैलीवर होतो. अशा मुलांच्या निरोगी मेंदुविकासावर आघात होऊन मेंदूची दुर्बलता दीर्घकाळ अडचणीची ठरते. अशा मुलांच्या मेंदू सबलतेसाठी त्यांचा आहार, आरोग्य आणि शिक्षण या गरजा पूर्ण करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने या विषयाचे विवेचन केले आले.

**मुख्य संबोध :** राष्ट्रीय शिक्षण धोरण *2020*, बालसंगोपन, बालशिक्षण, भूमिका

**प्रस्तावना**

राष्ट्रीय, शिक्षण धोरण 2020 ते 21 व्या शतकातील पहिले शिक्षण धोरण आहे. आणि या धोरणाचे ध्येय आपल्या देशातील वाढत्या विकासात्मक आवश्यकतांवर उपाययोजना करणे हे आहे. 21 व्या शतकातील शिक्षणाच्या महत्वाकांक्षी उदिष्टांशी सुसंगत प्रणाली विकसित करण्यासाठी भारताच्या परंपरा आणि मूल्ये यांवर भर देऊन शैक्षणिक रचनेचे नियमन व व्यवस्थापन यासह सर्व पैलूंमध्ये बदल-सुधारणा प्रस्तावित आहे. प्रत्येक व्यक्तीच्या सृजनक्षमतेवर भर आहे. प्राचीन आणि सनातन भारतीय ज्ञान आणि विचारांची समृद्ध परंपरा लक्षात घेऊन हे धोरण तयार केले आहे. भारतीय संस्कृती भाणि तत्वज्ञान यांचा जगावर खूप मोठा प्रभाव आहे. शालेय शिक्षणाच्या सध्याच्या 10+2+3 संरचनेत प्रातिनिधिक आकृतीमध्ये बदल होऊन आता 3-6 या वयोगटाला समाविष्ट करणारी 5+3+3+4 ही अध्यापनशास्त्राची आणि अभ्यासक्रमाची पुनर्रचना करणे हा या धोरणाचा उद्देश आहे. नवीन 5+3+3+4 संरचनेत वय वर्ष 3 पासून प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणाचा (ECCE) मजबूत पाया देखील समाविष्ट केला आहे. ज्याचा उद्देश सर्वांगीण शिक्षण विकास आणि हित यांना चालना देणे आहे. म्हणजेच इयत्ता पहिली मध्ये प्रवेश करणारे सर्व विद्यार्थी शालेय शिक्षणासाठी व स्वतः च्या सर्वांगीण विकासाठी सज्ज झालेले असतील. हे सर्व राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 च्या प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण यातील विविध भूमिकेत समाविष्ट आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे**

१) राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मधील बालसंगोपन व बालशिक्षणातील आहारविषयक भूमिका अभ्यासणे.
२) राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मधील बालसंगोपन व बालशिक्षणातील आरोग्यविषयक भूमिका अभ्यासणे.
३) राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मधील बालसंगोपन व बालशिक्षणातील अनौपचारिक शिक्षणविषयक भूमिका अभ्यासणे.

**संशोधनाचे महत्व :**

राष्ट्रीय शिक्षण धोरणात २०२० मध्ये बालशिक्षणाला प्रथमचं स्थान मिळाले आहे. बालशिक्षणात तीन ते सहा (3 ते 6) हे वय खूप महत्वाचे असते आणि पायाभूत असते हे नमूद केले आहे.

वयाच्या तिसऱ्या वर्षापर्यंत मेंदू घडणीचा वेगवान काळ असतो. मेंदुमधील परस्पर जुळणीच्या व मेंदुमधील विलक्षण



TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur

UGC CARE (Group I) Journal
ISSN: 0974-0066
मध्य भारती (Madhya Bharti)
मानविकी एवं समाजविज्ञान की शोध-पत्रिका

वेगवान हालचालीच्या काळात जवळ जवळ 10 अब्ज चेतापेशींच्या जोडण्या होऊन बालकाच्या शारीरिक, संवेदी साठी बौध्दीक प्रगतीस चालना मिळते. मेंदुमधील बौद्धीक टप्पा होण्याचा हा सुवर्णकाळ असतो.

भाषा विकासाचा म्हणजे भाषिक ज्ञान आणि कौशल्य, आत्मसात होण्याचा हा काळ! या वयातच बौद्धीक स्वरूपाच्या कार्यांना उधाण येते, धोरणातील भूमिका आहे की, इतरांशी होणाऱ्या वाढत्या संपर्काबरोबरच, इतरांशी जवळीकतेचे, विश्वासाचे नाते तयार होते. म्हणजे व्यक्तीच्या सामाजिकीकरणाची येथे सुरूवात होते.

धोरणात उल्लेख केल्याप्रमाणे शारीरिक, स्नायूविषयक, बौध्दीक, सामाजिक, भावनिक, नैतिक, परस्पर-संवाद, भाषा, साक्षरता वाढवण्याचा काळ. हा बालशिक्षणात पायाभरणीचा किंवा गुणसंपदा उभारण्याचा काळ असतो. अशावेळी योग्य असे आहारविषयक, आरोग्यविषयक व अनौपचारिक शिक्षण या मुलांना मिळाले पाहिजे.

लहान मुलांचे वर्गात प्रवेश करण्यासाठी आणि यशस्वी होण्यासाठी त्यांच्या सामाजिक- भावनिक- मानसिक आरोग्याच्या समस्यांचा धोका कमी करण्यापाठी आणि त्यांच्या आयुष्यात आत्मनिर्भरता वाढवण्यासाठी बालपणीचे शिक्षण महत्त्वाचे आहे.

शिक्षणातील अभ्यासक्रम (ECCE) ही प्रेरक शक्ती आहे. कर्मचाऱ्यांची ऊर्जा आणि प्रेरणा मिळून, कार्यक्रमांना जिवंत बनवणारी गती प्रदान करते. बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी पूरक आहार, आरोग्याविषयीच्या चांगल्या सवयी व अनौपचारिक शिक्षण आवश्यक आहे. हे काम आंगणवाडी सेविका करत असमात त्यामुळेच भावी पिढीचे भविष्य उज्वल होईल यासाठी या संशोधनाचे महत्व आहे.

**संशोधनाची मर्यादा:**

१) राष्ट्रीय शिक्षण धोरण भाग-1 शालेय शिक्षणातील प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण अध्ययनाचा पाया या भागापुरते मर्यादित आहे.

२) राष्ट्रीय शिक्षण धोरणातील 2020 मधील प्रारंभीक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण-अध्ययनाचा पाया या भागातील आहारविषयक, आरोग्यविषयक आणि अनौपचारिक शिक्षणांच्या भूमिकेविषयी मर्यादित आहे.

**विश्लेषणात्मक विषय विवेचन:**

**उद्दिष्ट 1 :** राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मधील बालाशिक्षणातील आहारविषयक भूमिका अभ्यासणे.

नवीन शैक्षणिक धोरण 2020 मध्ये प्रारंभिक बाल्यावस्था संगोधन आणि शिक्षण, अध्ययनाचा पाया म्हटले आहे. लहान मुलांच्या मेंदूच्या एकंदर विकासापैकी ८५% हून अधिक विकास वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत होतो. पण भारतात कुपोषण ही समस्या भेडसावते, पूरक पोषण आहार मिळाला नाही तर मेंदू विकासावर आघात होऊन मेंदूची दुर्बलता दीर्घकाळ अडचणीची ठरते. मेंदूवरील उणे परिणाम धुवून काढण्याची बदल-क्षमता मेंदूमध्ये असते. त्यासाठी शास्त्रशुध्द व दर्जेदार बालशिक्षणाची सोय करावी यासाठीचे चिंता व चिंतन आले आहे ECCE मध्ये पूरक आहारचे नियोजन राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये आले आहे.

**उद्दिष्ट 2 :** राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मधील बालशिक्षणातील आरोग्याविषयक भूमिका अभ्यासणे.

ECCE मध्ये लसीकरण पूरक आहार आणि वैयक्तिक स्वच्छता याविषयीचा हस्तक्षेप झाला आहे. तसेच इतर आरोग्यविषयक सवयी वाढवण्यापाठी आरोग्यविषयी उपक्रम आल्याने भारतासाठी व्यापक विकासात्मक फायदे निर्माण करण्याची क्षमता आहे. शाळामध्ये प्रवेश करणारी मुले निरोगी आणि सदृढ तयार होतील आणि त्यांच्या वैयक्तिक जीवनाबरोबर भारत देशालाही समृद्ध करतील.

**उद्दिष्ट 3 :** राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मधील बालशिक्षणातील अनौपचारिक शिक्षणविषयक भूमिका अभ्यासणे.

गुणवत्तापूर्ण बाल्यावस्था पूर्व विकास, संगोपन आणि पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिक तरतुदीमुळे ही मुले आयुष्यभर शैक्षणिक व्यवस्थेत सहभाग घेण्यात आणि उत्कर्ष साधण्यात सक्षम बनतील. कारण ECCE मध्ये अनौपचारिक शिक्षणाला महत्त्व आहे. NEP 2020 मध्ये बालशिक्षणामध्ये लवचिक, बहुपैलू बहुस्तरीय खेळांवर आधारित, कृती आधारित आणि जिज्ञासाआधारित शिक्षणाचा समावेश असावा. त्याप्रमाणे अक्षरे, भाषा, संख्या मोजणे, रंग, आकार ओळखणे, चित्रकला, कला, हस्तकला, नाटक आणि बोलक्या बाहुल्या संगीत, हालचाली याचाही समावेश आहे. त्याचबरोबर सामाजिक क्षमता. संवेदनशीलता, चांगली वर्तवणूक स्वच्छता, सहकार्य व सांघिक कार्य यांच्यावर लक्ष केंद्रीत केले आहे.

**निकर्ष:**

१) **राष्ट्रीय शिक्षण धोरण** 2020 मध्ये बालसंगोपन व बालशिक्षणात आहारविषयक भूमिका समाविष्ट आहेत.

२) **राष्ट्रीय शिक्षण धोरण** 2020 मध्ये बालसंगोपन आणि बालशिक्षणात आरोग्यविषयक भूमिका समाविष्ट आहेत.

३) **राष्ट्रीय शिक्षण धोरण** 2020 मध्ये बालसंगोपन आणि बालशिक्षणात अनौपचारिक शिक्षणविषयक भूमिका समाविष्ट **आहेत.**

**शिफारशी:**

वरील संशोधनावरून संशोधिकेने पुढील शिफारशी मांडल्या आहोत.

१) शासनाने बालसंगोपन व बालशिक्षण केंद्रांमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

२) शासनाने बालसंगोपन व बालशिक्षण केंद्रामध्ये अनौपचारिक शिक्षणासाठी आवश्यक शैक्षणिक साधने पुरवावीत.

३) शासनाने अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना आहार व आरोग्याविषाशी संबंधित सातत्याने प्रशिक्षण उपलब्ध करून द्यावीत.

४) शासनाने बालसंगोपन व बालशिक्षण केंद्रामध्ये पोषणमूल्ये असलेला पुरक आहार पुरवण्याची वृध्दी करावी.

५) शासनाने बालसंगोपन व बालशिक्षण केंद्रामध्ये सातत्याने बालकांची आरोग्य तपासणी करून आवश्यक त्या आरोग्य सुविधा पुरवाव्यात.

६) शासनाने बालसंगोपन व बालशिक्षण केंद्रामध्ये वैविध्यपूर्ण आहार शिजवून ताज्या स्वरूपात पुरवण्याची सोय करावी.

**समारोप:**

मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी समान भाणि न्याय समाज विकसित करण्यासाठी, विकासाला चालना देण्यासाठी, शिक्षण हाच पाया आहे. पुढची पिढी आत्मनिर्भर भारतासाठी, नवनिर्माणासाठी सज्ज होण्याच्या दिशेने टाकलेले एक पाऊल म्हणजे राष्ट्रीय शिक्षण 2020 होय. अर्ली चाइल्ड केअर अँड एज्युकेशन (ECCE) हे शालेय शिक्षणाचे अग्रदूत मानले जाते. शालेय शिक्षणापूर्वीची वर्षे मुलांना शालेय शिक्षणासाठी तयार करण्यात महत्वाची भूमिका बजावतात. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये प्रथमच वयाच्या 3 वर्षापासून बालपणाची काळजी आणि शिक्षणाचा विचार करण्यात आला आहे, तो स्वागतार्ह आहे.

**संदर्भ:**

1. करंदीकर, सु. (२००५) अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र फडके प्रकाशन, कोल्हापूर
२. मुळे, रा. रा. आणि उमाठे वी. तु. (1898) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर, साहित्य, प्रसाद केंद्र
३. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 शिक्षण मंत्रालय, भारत सरकार
4. Best, J. W. and Khan, J. V. (2005) Research in Education (9th eds.) New Delhi: prentice Hall India Pvt. Ltd.
5. http://unicef.org Retrieved on. Jan 2023
6. Shodhanga.Inflibnet.ac.in Retrieved on Jan. 2023
7. https://www.mr.vikuspedia.in Retrieved on Jun 2023.

TRUE COPY

Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209

286

Education and Society
(शिक्षण आणि समाज)

Special Issue
UGC CARE Listed Journal
ISSN 2278-6864

# Education and Society

**Since 1977**

**The Quarterly dedicated to Education through Social Development And Social Development through Education**

Special Issue on the theme of
**"Recent Trends, Challenges and Issues in Social Science and Languages"**

**July 2023**

**(Special Issue-1/ Volume-III)**

**Indian Institute of Education**
**J. P. Naik Path, Kothrud, Pune- 38**

**Indian Institute of Education**

**Education and Society**
Special Issue on the theme of "Recent Trends, Challenges and Issues in Social Science and Languages" (International Conference organized by Dr. Ganpatrao Deshmukh Mahavidyalaya, Sangola; dated 08 July 2023)

**Prof. J. P. Naik and Dr. Chitra Naik**
Founder of the Institute

**Editorial Board:**
Prin. Dr. Jayasing N. Kalake, Chief Editor
Dr. Prakash B. Salavi, Executive Editor
Mrs. Shailaja D. Sawant, Secretary

**Publisher:**
**Indian Institute of Education**
J. P. Naik Path, Kothrud, Pune- 38

**Contact Numbers:** 8805159904, 9834109804
**Web-site:** www.iiepune.org
**Email:** educationandsociety1977@gmail.com, iiepune1948@gmail.com

---

Education and Society, the educational quarterly is owned, printed and published by the Indian Institute of Education, Pune. It is printed at Pratima Mudran, 1-B, Devgiri Istate, Survey No. 17/1-B, Plot no. 14, Kothrud Industrial Area, Kothrud, Pune 38. It is published by the Editor Dr. Jaysing Kalake at Indian Institute of Education J. P. Naik Path, Kothrud, Pune- 38. Opinons or views or satatements and conclusions expressed in the articles that are published in this issue are personal of respective authors. The editor, editorial board and the institution will not be responsible for the same in any way.

287

Indian Institute of Education

Education and Society

Content...


1. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना गणित विषयातील चौकोन रचना व चौकोनाचे प्रकार आशय अध्यापनासाठी जिगसॉ कार्यनितीच्या परिणामकारकतेचा अभ्यास
डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई 009

2. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मराठी शुध्दलेखनाचा व हस्ताक्षराचा गुण संपादनावर होणारा परिणाम - एक अध्ययन 016
डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे (गणवीर)

3. जैवविविधतेचे पर्यावरणीय महत्त्व 022
डॉ. राजाराम महादेव थोरात

4. सोशल मीडिया आणि सेक्सटोर्शनची समस्या एक समाजशास्त्रीय अभ्यास 027
डॉ. अनिल म्हाळाप्पा गाडेकर

5. आदिवासी आणि राज्यघटना 033
नवनाथ तापीराम पवार, डॉ. प्रा. संजय अंकुश काळे

6. भारतातील माहिती अधिकाराचा विकास 040
नितीन राजाराम वाडीले, डॉ.विलास भारतराव बनसोडे

7. जिल्हा उद्योग केन्द्राच्या योजनांची उपयुक्तता एक विश्लेषणात्मक अध्ययन 047
डॉ. महेंद्र पांडुरंगजी गावंडे

8. शाश्वत विकासात घनकचरा व्यवस्थापनाचे महत्व अभ्यासणे 054
कु. विद्या बाळासाहेब तळखंडकर

# इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना गणित विषयातील चौकोन रचना व चौकोनाचे प्रकार आशय अध्यापनासाठी जिगसॉ कार्यनितीच्या परिणामकारकतेचा अभ्यास

डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई

आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी

**सारांश:**

मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी , समान आणि न्याय्य समाज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे. म्हणूनच चिरंजीवी विकासाचे ध्येय आहे-गुणवत्ता शिक्षण. शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता येण्यासाठी शासन कटीबध्द आहे. शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता आणण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या जातात. यामध्ये शिष्यवृत्ती, शिक्षण कर्ज स्पर्धा परीक्षा इत्यादींचा समावेश केला आहे. सामान्य परीस्थिती असलेल्या पण हुशार, होतकरु मुला मुलींना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी शासन विविध योजना राबवत आहे.गुणवत्ता पूर्ण शिक्षणातून गुणवत्ता पूर्ण विद्यार्थी तयार होतील जे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य घडवून चिरंजीवी विकासाचे ध्येय पूर्ण करण्यासाठीचे महत्वपूर्ण घटक आहेत. यासाठी शिक्षक प्रशिक्षण गुणवत्तापूर्ण असणे आवश्यक आहे. म्हणूनच बी.एड. अभ्यासक्रमामध्ये विविध विषय अध्यापन पध्दती, अध्यापनात कार्यनितीचा वापर, संशोधन, छात्राध्यापकांच्या व्यावयासायिक क्षमता वृध्दी होण्यासाठीच्या प्रात्यक्षिकांचा समावेश केला आहे. या सर्वांचा एकच हेतू तो म्हणजे चिरंजीवी विकासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण. म्हणूनच NEP2020 हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आले. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 हे 21 व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे. आणि या धोरणाचे ध्येय आपल्या देशातील वाढत्या विकासात्मक आवश्यकतांवर उपाययोजना करणे हे NEP 2020 मध्ये शालेय शिक्षणांत विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास व कृतिआधारित शिक्षणावर भर दिला आहे. गणित हा अमूर्त विषय आहे. त्या विषयातील आशयाचे आकलन होण्यासाठी विद्यार्थ्यांचा कृतियुक्त सहभाग असणे आवश्यक आहे. तरच विदयार्थी स्वत:हून गणितातील विविध उदाहरणे सोडवतील. त्यांचा वर्गात सराव केल्यास गणिताबद्दल अभिरुची निर्माण होईल. यासाठी विविध अध्यापन पध्दती, कार्यनिती,गणिती खेळ यांचा वापर करणे आवश्यक आहे. याच हेतूने संशोधिकेने प्रस्तुत संशोधनात कार्यनितीचा वापर करुन अध्यापनाची परिणामकारकता अभ्यासण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषय निवडला आहे.

मुख्य शब्द: इयत्ता आठवीचे विद्यार्थी, गणित विषय आशय अध्यापन, जिगसॉ कार्यनिती, परिणामकारकता, अभ्यास

**प्रस्तावना:**

गणित हा सर्व शास्त्रांचा पाया आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात गणित महत्वाचे आहे. शिक्षण क्षेत्र , कृषि, तंत्रज्ञान , औदयोगिक व व्यावसायिक क्षेत्रात गणिताचे ज्ञान महत्वाचे व गरजेचे आहे. दैनंदिन जीवनामध्ये सर्व व्यवहार पार पाडताना गणिताचे ज्ञान हवे. गणित विषयाच्या शिक्षकाला विदयार्थ्यामध्ये गणित विषयाची अभिरुची, कौशल्ये , गणितीय दृष्टीकोन रुजविण्यासाठी विविध अध्यापन पध्दती , कार्यनितीचा वापर करणे आवश्यक आहे. गणित अध्ययन अध्यापनामध्ये विदयार्थी केंद्रबिंदू असणे आवश्यक आहे विदयार्थ्यामध्ये जास्तीत जास्त कृतीयुक्त अनुभवाची संधी व पूर्वज्ञानाचा वापर करण्याचे कौशल्य निर्माण केले तर गणित आकलन सोपे होते. तसेच यामध्ये सराव व सातत्य ठेवले तर



TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
G... Dist. Kolhapur 416...

गणिताची आवड निर्माण होऊन गणिताची भिती नाहिशी होते. गणित आशयाचे छोटया भागात विभाजन करुन गटाने चर्चा करुन अध्ययन करण्याची संधी विदयार्थ्यांना दिली तर विदयार्थ्यांच्या गणित आकलनात धनात्मक बदल दिसतो व आंतरव्यक्ती संबंध कौशल्य वाढीस लागते. म्हणूनच संशोधिकेने प्रस्तुत संशोधनात जिगसॉ कार्यनिती वापराच्या परिणामकारकतेचा अभ्यास करण्याच्या हेतूने प्रस्तुत संशोधन समस्येची निवड केली आहे.

**समस्या विधान:**

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना गणित विषयातील चौकोन रचना व चौकोनाचे प्रकार आशय अध्यापनासाठी जिगसॉ कार्यनितीच्या परिणामकारकतेचा अभ्यास.

**संशोधन उद्दिष्टे:**

संशोधिकेने संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित केली आहेत.

1) इयत्ता आठवीच्या विदयार्थ्यांना गणित विषयातील चौकान रचना व चौकोनाचे प्रकार, आशयाचे पारंपरिक पध्दतीने अध्यापन करणे.

2) इयत्ता आठवीच्या विदयार्थ्यांना गणित विषयातील चौकोन रचना व चौकोनाचे प्रकार आशयाचे जिगसॉ कार्यनितीचा वापर करुन अध्यापन करणे.

3) इयत्ता आठवीच्या विदयार्थ्यांना गणित विषयातील चौकोन रचना व चौकोनाचे प्रकार आशय अध्यापनासाठी वापरलेल्या जिगसॉ कार्यनितीच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

**संशोधन महत्व:**

प्रस्तुत संशोधनाचे महत्व पुढीलप्रमाणे आहे.

1) गणित हा विषय अमूर्त , क्रमबद्ध आहे. या विषयातील आशयाचे आकलन होण्यासाठी, मूलभूत संबोधाचे ज्ञान होण्यासाठी, आशयाचे छोटया घटकात रुपांतर करुन अध्ययन करण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

2) प्राथमिक , माध्यमिक शिक्षक , पालक यांना गणित अध्ययन अध्यापनासाठी जिगसॉ कार्यनिती कशाप्रकारे वापरता येते हे समजण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.

3) गणित विषयाचे आकलन होण्यासाठी सहकार्यात्मक अध्ययन प्रभावी ठरते. विदयार्थी एकमेकाकडून शंका समाधान करुन घेतात. यामुळे आंतरव्यक्ती संबंध कौशल्य वाढीस लागते. व विद्यार्थ्यांची गणित विषयातील गुणवत्ता वाढीस लागते. यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.

4) संपूर्ण वर्गासमोर, आकलन झालेला आशय / गणित सादर करता आल्यामुळे धाडस, अचूकता , स्पष्टता इत्यादी गुण वाढीस लागण्यास मदत होते.

**संशोधनाची व्याप्ती:**

1) प्रस्तुत संशोधनामध्ये वापरलेली जिगसॉ कार्यनिती ही प्राथमिक , माध्यमिक , उच्चमाध्यमिक शिक्षकांशी संबंधित आहे.

2) प्रस्तुत संशोधनामध्ये वापरलेली जिगसॉ कार्यनिती बी.एड, डी.टी. एड महाविद्यालयातील छात्रप्रशिक्षणार्थीशी संबंधित आहे.

**संशोधनाची परिमर्यादा:**

1) प्रस्तुत संशोधन हे भुदरगड तालुक्यातील शंकरराव देसाई हायस्कूल, म्हसवे या शाळेतील मराठी माध्यमाच्या आठवीच्या वर्गापुरते मर्यादित आहे.

2) प्रस्तुत संशोधन हे सन 2021- 22 सालापुरते मर्यादित आहे.

3) प्रस्तुत संशोधन हे गणित विषयातील 'चौकोन रचना व चौकोनाचे प्रकार' या आशयापुरते मर्यादित आहे.

4) प्रस्तुत संशोधन हे 'जिगसॉ' कार्यनिती वापरापुरते मर्यादित आहे.

**संशोधनाची गृहीतके:**

1) इयत्ता आठवीच्या विदयार्थ्यांना चौकोन ही संकल्पना माहित आहे.

2) विदयार्थी चौकोन आकृतीवरुन चौकोनाचे घटक बाजू, कोन, शिरोबिंदू ओळखतात.

**संशोधन परिकल्पना:**

इयत्ता आठवीच्या विदयार्थ्यांना गणित विषयातील चौकोन रचना व चौकोनाचे प्रकार आशय अध्यापनासाठी जिगसॉ कार्यनिती परिणामकारक ठरते.

**शून्य परिकल्पना:**

इयत्ता आठवीच्या विदयार्थ्यांना गणित विषयातील चौकोन रचना व चौकोनाचे प्रकार आशय अध्यापनासाठी जिगसॉ कार्यनिती वापराचा विदयार्थ्यांचा संपादणूकीवर कोणताही परिणाम होत नाही.

**संशोधन कार्यपध्दती:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने प्रायोगिक पध्दतीचा वापर केला आहे. प्रस्तुत संशोधनात जिगसॉ कार्यनितीचा वापर करुन अध्यापन केले आहे. शालेय अंतिम सत्र परीक्षेतील गुणांनुसार विदयार्थ्यांचे प्रायोगिक गट व नियंत्रित गटात विभागणी करुन प्रायोगिक गटाला जिगसॉ कार्यनितीचा वापर करुन अध्यापन केले . व नियंत्रित गटाला पारंपरिक पध्दतीने अध्यापन केले. यासाठी 20 विदयार्थ्यांमधील चार विदयार्थ्यांच्या एक गट याप्रमाणे पाच गट केले. प्रत्येक गटातील प्रत्येक विदयार्थ्याला आशयाचा छोटा भाग अभ्यासण्यासाठी कार्यपत्रक तयार करुन दिले. त्या कार्यपत्रकातील सूचनांनुसार त्यांना कृती करण्यास व पूर्वज्ञानाचा वापर करण्यास  सांगितले . रज्ज्ञ गटांची निर्मीती केली. त्यागटांतील चर्चेनंतर प्रत्येक विद्यार्थी आपापल्या गटात जातो व गटात आशय समजावून सांगतो. प्रत्येक विदयार्थ्यांने आपला आशय समजून घेऊन तो इतर सहका-यांना समजावून सांगणे. व गटातील सर्वांनी एकमेकाकडे दिलेला आशय समजून  घेऊन गटातील एका विदयार्थ्यांने वर्गासमोर आशय स्पष्ट करण्याची सूचना दिली. गटात आशय समजून घेताना चर्चा करणे, पूर्वज्ञानाचा वापर करणे, शंका निरसन करुन घेणे, नोंदी करणे, इत्यादी कृती करण्यास सांगितले . प्रत्येक गटातील एका विदयार्थ्याचे सादरीकरण फलकावर करण्यास सांगून त्याची अचूकता शिक्षक पडताळून पहातात. अशा प्रकारे चौकोन रचना व चौकोनाचे प्रकार या आशयाचे अध्ययन अध्यापन पूर्ण झाल्यानंतर प्रायोगिक व नियंत्रित गटाची संपादन चाचणी घेतली. गुणांच्या विश्लेषण व अर्थनिर्वचनावरुन निष्कर्ष काढण्यात आला.

**जिगसॉ कार्यनिती:**

जिगसॉ ही सहकार्यात्मक अध्ययन कार्यनिती आहे. की जी प्रत्येक विदयार्थ्याचे आकलन दृढ करण्यास मदत करते, विद्यार्थ्यांना सहकार्याने अध्ययनास प्रवृत्त करते. या कार्यनितीच्या वापरामुळे विदयार्थ्यांचे श्रवण , संप्रेषण व समस्या निराकरण कौशल्य वाढीस लागते.

**जिगसॉ कार्यनिती संकल्पना:**

गटातील प्रत्येक सदस्य आपल्या वाटयाचा नेमून दिलेला पाठाचा लहान हिस्सा वाचून समजून घेतो, अभ्यासतो. नंतर गटात एकत्र बसून पाळीने प्रत्येकजण आपापला भाग इतर सदस्यांना समजावून सांगतो. त्यावेळी अर्थात चर्चा होते, न समजलेल्या गोष्टी एकमेकांना स्पष्ट करतात आणि अशा प्रकारे संपूर्ण पाठ गटाला समजतो. अनेकदा समान

पाठयभाग अभ्यासणारे विदयार्थी एकत्र येऊन सखोल चर्चा करुन त्या पाठयभागाचे 'तज्ज्ञ' बनतात आणि ते आपापल्या मूळ गटात जाऊन इतरांना तो पाठयभाग शिकवितात.

**जिगसॉ कार्यनितीच्या पाय-या:**

जिगसॉ कार्यनितीच्या पाय-या पुढीलप्रमाणे आहेत.

1) शिक्षकाकडून घटकाचे लहान भागात विभाजन करणे.

2) विदयार्थ्यांचे गट पाडून गटात आशय विभागणी करणे.

3) तज्ज्ञ गटाची निर्मिती करणे.

4) गटातील विदयार्थ्यांना जिगसॉ कार्यनितीनुसार अध्ययनासाठी आराखडा/ कार्यपत्रक देणे.

5) गटात जिगसॉ कार्यनितीनुसार अंमलबजावणी करणे.

6) सादरीकरण – तज्ज्ञ गटातील एका विदयार्थ्याकडून आशय सादरीकरण करुन घेणे.

7) मूल्यमापन – शिक्षक आशय मूल्यमापन करुन पाठाचे उद्दिष्ट कितपत पूर्ण झाले याचा आढावा घेतात. अशा प्रकारे उपरोक्त संशोधिकेने उपरोक्त पाय-यांनुसार जिगसॉ कार्यनितीचा वापर केला.

जिगसॉ कार्यनिती वापरताना कार्यपत्रकाचा वापर पुढीलप्रमाणे

**कार्यपत्रक क्र. 1**

**आशय:**

**सूचना: विदयार्थ्यांने कार्यपत्रक कशाप्रकारे वापरावे याची सूचना देणे**

| विदयार्थी 1 | विदयार्थी 2 | विदयार्थी 3 | विदयार्थी 4 | गटात चर्चा | तज्ज्ञ गटचर्चा व आपापल्या मूळ गटात आशय समजावून देणे | सादरीकरण |
|---|---|---|---|---|---|---|
| कार्यक्रमांक 1 छोटा आशय- विदयार्थ्यांनी कृती कशी करावी यासाठीच्या सूचना | कार्यक्रमांक 2 छोटा आशय- विदयार्थ्यांनी कृती कशी करावी यासाठीच्या सूचना | कार्यक्रमांक 3 छोटा आशय- विदयार्थ्यांनी कृती कशी करावी यासाठीच्या सूचना | कार्यक्रमांक 4 छोटा आशय - विदयार्थ्यांनी कृती कशी करावी यासाठीच्या सूचना | चारही विदयार्थी आपापला आशय इतर विदयार्थ्यांना समजावून देतात. विदयार्थी शंका समाधान करून घेतात. नोंदी करतात | तज्ज्ञगटातील विदयार्थी आपापल्या तज्ज्ञगटात चर्चा करतात व आपापल्या मूळ गटात जाऊन आशय समजावून देतात. विदयार्थी शंका समाधान करून घेतात. नोंदी करतात | प्रत्येक गटातील एक विदयार्थी फलकाजवळ जाऊन आशय सादरीकरण करतो. |

**प्रायोगिक पध्दतीनुसार संशोधन कार्यपध्द्तीचा ऑघतक्ता:**

**संशोधनाचा ऑघतक्ता:**




प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने समान गट अभिकल्पनाचा वापर केला आहे.

**प्रायोगिक अभिकल्प:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने समानगट अभिकल्पाचा वापर केला आहे.




**संशोधन नमुना निवड:**

संशोधिकेने प्रस्तुत संशोधनासाठी सहेतुक नमुना निवड पध्दतीचा वापर केला आहे. शंकरराव देसाई हायस्कूल , म्हसवे शाळेतील इयत्ता आठवीच्या वर्गातील एकूण 40 विदयार्थ्यांची निवड केली आहे. शालेय अंतिम सत्र परीक्षेतील गुणांनुसार त्यांचे दोन गटात विभाजन केले आहे.

शंकरराव देसाई हायस्कूल , म्हसवे



प्रायोगिक गट (20 विदयार्थी )

नियंत्रित गट (20 विदयार्थी)

जनसंख्या = 40 एकूण विदयार्थी = 40 न्यादर्शाचा आकार 100 %

संशोधनाची साधने - प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने पुढील संशोधन साधनांचा वापर केला आहे.

1) उत्तरचाचणी ( संशोधिकानिर्मित)

**संख्याशास्त्रीय साधने:-**

1) मध्यमान 2) प्रमाण विचलन 3) 't' test

उद्दिष्टानुसार संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन:

उद्दिष्ट क्र. 1,2,3, नुसार

1) इयत्ता आठवीच्या विदयार्थ्यांना गणित विषयातील चौकान रचना व चौकोनाचे प्रकार, आशयाचे पारंपरिक पध्दतीने अध्यापन करणे.

2) इयत्ता आठवीच्या विदयार्थ्यांना गणित विषयातील चौकोन रचना व चौकोनाचे प्रकार आशयाचे जिगसॉ कार्यनितीचा वापर करुन अध्यापन करणे.

3) इयत्ता आठवीच्या विदयार्थ्यांना गणित विषयातील चौकोन रचना व चौकोनाचे प्रकार आशय अध्यापनासाठी वापरलेल्या जिगसॉ कार्यनितीच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

इयत्ता आठवीच्या विदयार्थ्यांमध्ये 'चौकोन रचना व चौकोनाचे प्रकार' आशयासाठी जिगसॉ कार्यनितीच्या परिणामकारकतेचे संख्याशास्त्रीय प्रमाण.

| | प्रायोगिक गट | नियंत्रित गट |
|---|---|---|
| मध्यमान | 20. 1 | - 0.7 |
| प्रमाणविचलन | 41.8452 | 48.8196 |
| 't' test | प्राप्त 't' = 2.6024<br>0.05 स्तर df = 19<br>पत्रक 't' = 2.09 | |

**अर्थनिर्वचन:**

यावरुन असा अर्थ निघतो कि, इयत्ता आठवीच्या नियंत्रित गटापेक्षा प्रायोगिक गटाचे मध्यमान ( Mc = - 0.7, $M_E$ = 20.1 ) अधिक आहे व प्रमाणविचलन ( S.D c = 48.8196, $SD_E$ 41.8452) वरुन नियंत्रित गटामधील गुणांमध्ये विविधता / कमी जास्तपणा ( variation ) दिसून येतो. तर प्रायोगिक गटामधील गुणांमध्ये (variation) कमीजास्त पणा कमी दिसून येतो.स्वाधिनता मात्रा 19( df) 0.05 स्तरावर प्राप्त 't' चे मूल्य 2.6024 व नमुना 't' (2.09 ) पेक्षा मोठा असल्याने तो सार्थ आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

**निष्कर्ष:**

इयत्ता आठवीच्या विदयार्थ्यांना गणित विषयातील चौकोन रचना व चौकोन प्रकार आशय अध्यापनासाठी जिगसॉ कार्यनिती परिणामकारक आहे.

**शिफारशी:-**

**संशोधनाच्या निष्कर्षावरुन संशोधिकेने पुढील शिफारशी मांडल्या आहेत.**

1) **प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक स्तरावरील शिक्षकांनी गणित अध्यापनासाठी विविध कार्यनितींचा वापर करावा. उदा. युग्मसहभागिता कार्यनिती , समस्यानिराकरण कार्यनिती इ.**

2) कार्यनिती वापर करुन अध्यापन करताना जागा जास्त लागते यासाठी शाळा प्रशासनाने शिक्षकाला तशी सोय करुन दयावी.
3) कार्यनिती वापरताना शिक्षकांनी तासिकांचे योग्य नियोजन करावे.
4) इंटरनेटचा वापर करुन अद्ययावत अध्ययन अध्यापन कौशल्ये, कार्यनिती यांचा अभ्यास करुन अध्यापनात त्याचा वापर करावा.
5) शिक्षकांनी चर्चासत्रे, संमेलने, कार्यशाळा यांना उपस्थित राहून आपले ज्ञान अद्ययावत करावे.
6) शिक्षकांनी पालकांना या कार्यनितींची माहिती करुन देऊन त्यांचे सहकार्य घेऊन विदयार्थी प्रगती करावी.
7) चिरंजीवी विकासाचे ध्येय-गुणवत्ता शिक्षण, या ध्येय पूर्तीसाठी शासन, शाळा, शिक्षक, पालक, विद्यार्थी, समाज यांनी एकत्रीत प्रयत्न करावेत.

संदर्भसूची:


1) आगाशे, ललिता ( 14 नोव्हें 2010 ) सहकार्यात्मक अध्ययन: गट अध्यापन पुणे : विद्यार्थी गृह प्रकाशन
2) Best, J. W (2007) Research in Education Englewood clifts N. J prentice Hall
3) Kothari, C. R ( 2005 ) Research methodology New age , International ( p) Limited, publishers. Ansari Road , Daryaganj, New Delhi.
4) Kagaon , spencer ( 1999) Dr. spencer Kagan'sThoughts on cooperative Learning Retrieved on 28 May 2023
5) Marjorie Montague (2003 ) Math problem solving for middle school students with disabilities Retrieved on 28 May 2023


**Weblink:**


1. https://www.readingrockets.org/st....
2. https://www.shikshanmitra.com>N...


TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209


TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209

(288)

ISSN 2277-8063 (Print)
March - 2023
Vol. XII/ Issue. I / 2023
Impact Factor – 8.041

Navjyot
नवज्योत

# International Interdisciplinary Research Journal

## Science, Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management

*(A Quarterly, High Impact Factor, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*Indexed by:*

Scientific Journal Impact Factor
TOGETHER WE REACH THE GOAL
IIJIF IIJS Cosmos

**Chief Editor**
**Prof. Dr. Ravindra P. Bhanage**
Dept. of Political Science,
Shivaji University,
Kolhapur.

*- Published by-*
**HOUSA Publication**

TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 4162[illegible]

Scanned with CamScanner

289
ACHARYA JAWADEKAR COLLEGE OF EDUCATION
GARGOTI.

# Editorial

महात्मा गांधी यांचे विचार स्वरूप आणि वास्तव या विषयावरील शोधनिबंधाचे 'नवज्योत' जर्नलमध्ये प्रकाशन होत आहे. ही बाब अत्यंत आनंदाची आहे. संपूर्ण जगाला शांतीचा संदेश देणारे गांधीजी हे आपल्या कृतिशील विचारांना 'महात्मा' झाले. सत्य, अहिंसा व अशाकाराने स्वातंत्र्य प्राप्त करता येते हे त्यांनी जगाला दाखवून दिले. म.गांधीजीच्या विचारांची बैठक ही जगातील अनेक विचारवंत व तत्वज्ञ यांच्या वैचारिक योगदानान तयार झाली होती. विषमतावादी, समाजरचनेट सामाजिक अभिसरणाशिवाय समतामूल्य निर्माण होणार नाही. अनेक सामाजिक, राजकीय व आर्थिक विचार म. गांधीनी अत्यंत प्रभावीपणे मांडले. आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही हे विचार मार्गदर्शक ठरतात. म्हणूनच पुन्हा गांधीच्या विचारांचे मंथन होणे ही काळाची गरज आहे.

सत्यासाठी जगलेल्या आणि सत्यासाठी मरण पत्करलेल्या महात्मा गांधी या व्यक्तिमत्वाने भारत देशावर नव्हे तर संपूर्ण जगावर स्वत:चा वैचारिक प्रभाव टाकलेला आहे. त्यामुळेच प्रत्येक शतकातील महनीय व्यक्तींनी मग ते राजकिय असोत की, सामाजिक, वैज्ञानिक क्षेत्रातील असोत त्यांनी महात्मा गांधी यांना सदैव वंदनीय मानलेले आहे. त्यामुळेच 'म. गांधी नावाचा हाडामासांचा एक माणूस या पृथ्वीतलावर होऊन गेला. यावर पुढील पिढ्या कदाचित विश्वास ठेवणार नाहीत.' असे उद्गार विख्यात शास्त्रज्ञ आईनस्टाईन यांनी काढलेले आहेत. तर नेल्सन मंडेला, मार्टिन ल्युथर किंग (ज्यु.) यांनी आपल्या सामाजिक चळवळींचा आधार म. गांधी यांचा विचार मानलेला होता.

आपल्या देशात व पर्यायाने जगभरातील अनेक कथा, कादंबऱ्या, कविता, सिनेमे, नाटक, वैचारिक ग्रंथ, समीक्षात्मक, तुलनात्मक ग्रंथ, विविध सामाजिक, राजकीय चळवळी यांच्यावर म. गांधींच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. या प्रभावाचा अभ्यास करण्याच्या उद्देशातूनच 'म. गांधी यांचे विचार स्वरूप आणि वास्तव' या प्रस्तुत मुख्य विषयाला मध्यवर्ती ठेऊन एकूण ५० उपविषयांवर आधारित आर्ट्स, कॉमर्स, सायन्स, विधी, सामाजिक शास्त्रे इत्यादी विभागातील प्राध्यापक वर्गांनी, संशोधक विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत आपले शोधनिबंध पाठवून दिले आहेत. या शोधनिबंधाचा विचार केला तर ज्या उद्देशाने प्रस्तुत 'म. गांधी यांचे विचार स्वरूप आणि वास्तव' हा विषय प्राध्यापक व संशोधक विद्यार्थीसमोर चिंतन, मनन व लेखनासाठी ठेवला होता तो सफल झाला असे वाटते.

धन्यवाद!

Scanned with CamScanner

JAWADEKAR COLLEGE OF EDUCATION GARGOTI

# महात्मा गांधी : अहिंसक मार्गाचा दीपस्तंभ

डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई, सहयोगी प्राध्यापक, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर संलग्नित आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय , गारगोटी ता. भुदरगड जि. कोल्हापूर

**सारांश-**

महात्मा गांधी हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते आणिक तत्त्वज्ञ होते. त्यांनी देशहितासाठी शेवटच्या श्वासापार्यंत लढा दिला. स्वातंत्र्य चळवळीतील ते असे नेते होते ज्यांनी अहिंसेचा मार्ग अवलंबून ब्रिटीश राज्यकर्त्यांना थक्क केले होते.

महात्मा गांधींना राष्ट्रपिता म्हणून संबोधले जाते. मार्टिन ल्युथर किंग आणि नेल्सन मंडेला यांच्यावरही त्यांच्या सत्य आणि अहिंसेच्या विचार सरणीचा खूप प्रभाव होता. महात्मा गांधीनी अफ्रिकेत सलग एकवीस वर्षे अन्याय आणि वर्णद्वेषाविरुध्द अहिंसक मार्गाने लढा दिला, ज्यांची किंमत केवळ अफ्रिकेतच नव्हे तर भारतातही ब्रिटीशांना भोगावी लागली. सद्यस्थितीचा विचार करता महात्मा गांधींच्या सत्य, अहिंसा या विचार सरणीची समाजाला गरज आहे. माणूस अहिंसक मार्गाने स्वत:चे जीवन यशस्वीपणे जगू शकतो. समाजालाही एक सकारात्मक दिशा मिळू शकते. या हेतूने संशोधिकेने प्रस्तुत विषय निवडला आहे.

Keywords- महात्मा गांधी, अहिंसक मार्ग, दीपस्तंभ.

**प्रस्तावना**

महात्मा गांधी एक वकील, वसाहतविरोधी राष्ट्रवादी नेते आणि राजकीय नैतिकतावादी होते. ब्रिटीश राजवटीपासून भारताच्या स्वातंत्र्यांच्या यशस्वी मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी महात्मा गांधींनी अहिंसक आंदोलनाचा वापर केला. नंतर जगभरातील अनेक नागरी हक्क आणि स्वातंत्र्य चळवळींना महात्मा गांधीकडून प्रेरणा मिळाली.

**महात्मा गांधीचे अनमोल विचार मांडताना महात्मा गांधी म्हणतात,**

1. "अहिंसा हे बलवानांच शस्त्र आहे".
2. "हिंसेच्या मार्गाने एखादी गोष्ट साध्य होते तेव्हा ते यश तात्पुरते असेते त्यामुळे होणारे नुकसान मात्र दीर्घकालिन असते".
3. "अहिंसा हा माझ्या श्रदधेचा पहिला लेख आहे. तसेच तो माझ्या संप्रदायाचा शेवटचा लेख आहे".
4. अहिंसेचे पुजारी, सत्याच्या वाटेवरून चालणारे ईमानदारीचे धडे देणारे गांधीजी म्हणतात, "आपण एखादे काम हाती घेतले तर आपले अंत:करण त्यात ओतावे व त्याचे फळ ईश्वरावर सोपवावे".
5. "तोडफोड, राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान, रास्ता रोको यासारख्या कृतींना लोकशहीत काहीही स्थान नाही. जो अशा कृतींना प्रोत्साहन देतो त्याला लोकशाहीबद्दल बोलण्याचा काहीही अधिकार नाही".
6. "अहिंसा ही मनुष्याची सर्वात मोठी ताकद आहे. हे जगातील कोणत्याही हत्यारापेक्षा अधिक ताकदवान आहे".
7. "एखादा देश आणि त्याची नैतिक मूल्ये किती महान आहेत. हे निथल्या प्राण्यांना कशी वागणूक देतात त्यावरूनही कळून येते".

अहिंसेबद्दल, मानव व मानवेतर प्राण्यांबद्दल सन्हदयता, संवेदनशील असणाऱ्या महात्मा गांधींच्या विचारांची नैतिकतेची सत्य व अहिंसक मार्गाची आज भारतालाच नाही तर संपूर्ण जगाला गरज आहे. या शोधनिबंधाच्या माध्यमातून थोडीफार जागरुकता व्हावी या हेतूने संशोधिकेने प्रस्तुत संशोधन लेखाची निर्मिती केली आहे.

**संशोधनाची उदिष्टे-**

**प्रस्तूत संशोधनासाठी संशोधिकेने पुढील उदिष्टे मांडली आहेत.**

1. महात्मा गांधीचे बालपण व प्रारंभिक जीवनाचा अभ्यास करणे.
2. महात्मा गांधीचे दक्षिण अफ्रिकेतील कार्यांचा अभ्यास करणे.

IC. Principal
Acharya Jawadekar College of Education,
Gargoti, Dist. Kolhapur.



TRUE COPY
Principal
Acharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209
Scanned with CamScanner

3. महात्मा गांधीनी केलेल्या चळवळींचा अभ्यास करणे.

**विश्लेषणात्मक विषय विवेचन-**

**महात्मा गांधींचे बालपण व प्रारंभिक जीवन**

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म 2 ऑक्टोबर 1969 रोजी गुजरात मधील पोरबंदर शहरात झाला. त्यांची आई धार्मिक तर वडील ब्रिटीश राजवटीत एका छोट्या संस्थानचे दिवाण होते.

वयाच्या 13 व्या वर्षी त्यांचा विवाह कस्तुरबा यांच्याशी झाला. नोव्हेंबर 1887 मध्ये मॅट्रीक पास होऊन, पदवी प्राप्त केली व 4 सप्टेंबर 1888 रोजी ते लंडनला कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेले आणि बॅरीस्टर झाले.

**महात्मा गांधींचे दक्षिण आफ्रिकेतील कार्य-**

गांधीजी 1893 मध्ये एका हिंदी कंपनीचे वकील म्हणून दक्षिण अफ्रिकेत गेले होते. दक्षिण अफिक्रेत त्यांना गौरेतर लोकांबददल असलेल्या भेदभावाला सामोरे जावे लागले. तेथे त्यांनी भारतीयांना दिली जाणारी असमान वागणूक अनुभवली. पहिल्या वर्गाचे तिकीट असतानासुदधा त्यांना पीटरमारित्झबर्ग मध्ये रेल्वे अधिकाऱ्यांनी तृतीय वर्गाच्या डब्यात बसण्यास सांगितले. याला नकार देताच त्यांचा अमपान करून त्यांना डब्यातून ढकलून दिले. या घटनेनंतर गांधीनी अन्याया विरुदध आवाज उठवण्यास व समाजात स्वत:चे स्थान निर्माण करण्यास सुरूवात केली.

1894 मध्ये दक्षिणअफ्रिका भारतीय कॉंग्रेसची स्थापना केली. याच्या माध्यमातून त्यांनी सत्याग्रहाच्या, अहिंसेच्या मार्गाने भारतीयांवरील अन्याया विरुद लढवण्याची नोंद घेण्यास व गांधीशी वाटाघाटी करण्यास दक्षिण आफ्रिकेतील नेता जॉन क्रिस्तिआन स्मटस याला भाग पाडले.

महात्मा गांधींचे चळवळींच्या माध्यमातून कार्य-

**1) चंपारण्य सत्याग्रह (1917)**

बिहारमधील चंपारण्य येथील युरोपीय निळिच्या मळेवाल्याकडून शेतकऱ्यांवर अत्याचार होत असत. शेतकऱ्यांना सक्तीने नीळ उत्पादन करण्यास लावत व योग्य मोबदला दिला जात नसे. त्यामुळे शेतकरी गरीबीत रहात. त्यांची गावे अस्वच्छ व अरोग्यास हानीकारक ठेवली जात. तेथे दुष्काळ असे पण तरीही इंग्रजांनी अनेक जाचक कर लावले होते. यासाठी गांधीजींनी अहिंसक चळवळ सुरू केली व यशस्वीही झाले. इंग्रजांना त्यांचे पालन करावे लागले.

**खेडा सत्याग्रह (1918)**

सन 1918 मध्ये गुजरातमधील खेडा जिल्हात दुष्काळ पडला. पिके बुडाली, तरीही शासकीय अधिकारी शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने शेतसारा वसूल करत.

मोहनलाल पांडे नावाच्या नेत्याने गांधीजींना आमंत्रित केले. गांधीजींनी "साराबंद चळवळ" सुरू केली. शासनाने या चळवळीची दखल घेवून दुष्काळी भागात जमिन महसूल वसुलीला स्थगिती दिली. या चळवळीत गांधीजींना सरदार वल्लभभाई पटेल, डॉ.राजेंद्र प्रसाद, विठ्ठलभाई पटेल यांचे सहकार्य लाभले.

**रौलट ॲक्ट (1919)-**

भारतातील राष्ट्रीय आंदोलन व क्रांतीकारी चळवळीला प्रतिबंध घालण्याकरीता ब्रिटीश शासनाला नवीन कायद्याची गरज होती. या कायद्याचा अहवाल तयार करण्यासाठी सर सिडने रौलट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने एप्रिल 1918 रोजी अनारकिकल अँन्ड रिव्हॉल्युशनरी क्राईम ॲक्ट पास केला. या कायद्यातील तरतुदीनुसार कोणत्याही व्यक्तीला विना चौकशी अटक करून, तीन न्यायाधिशांच्या चौकशी मंडळापुढे चौकशी करून शिक्षा करण्याचा अधिकार शासनास मिळाला होता. गांधीजींनी 1919 मध्ये रौलेट कायद्याच्या निषेधार्थ सभा घेतली व 6 एप्रिल 1919 हा दिवस संपूर्ण भारतभर सत्याग्रहाचा दिवस म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला. या दिवशी हरताळ, उपवास, निषेध मिरवणूका आणि निषेध सभा घेतल्या हा सत्याग्रह कार्यक्रम यशस्वी ठरला.

**असहकार चळवळ (1920)**

रौलेट कायदा जालियनवाला बाग हत्याकांड, खिलाफत चळवळ, देशात सर्वत्र सरकारने चालवनलेले दडपशाहीचे सत्र यामुळे भारतीय जनतेत संताप निर्माण झाला. देशातील वातारवरण सरकार विरोधी झाले. या जनतेच्या भावना लक्षात घेऊन गांधीजींनी असहकार चळवळ सूरु करण्याचा निर्णय घेतला.

10 मार्च 1920 रोजी त्यांनी असहकाराचा जाहिरनामा प्रसिदध केला. 4 सप्टेंबर 1920 रोजी लाला लजपतराय यांच्या अध्यक्षेतेखाली भरवलेल्या कॉंग्रेसच्या विशेष अधिवेशनात असहकार कार्यक्रम ठरावाला संमती दिली.

**चौरीचौरा दुर्घटना (उत्तर प्रदेश 1922)**

डिसेंबर 1921 मध्ये अहमदाबाद येथे राष्ट्रसभेचे अधिवेशन झाले. हजारो कार्यकर्ते तुरूंगात असतानासुदधा असहकार चळवळ जोमाने चालू ठेवण्याचा निर्णय अधिवेशनात घेण्यात आला. 5 फेब्रुवारी 1922 रोजी उत्तरप्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यात चौरीचौरा गावी जमावाने पोलिस चौकी जाळली.यात 22 पोलिस ठार झाले. या बातमीने गांधीजींना व्यतीत होऊन चळवळ हिंसक बबत चालली म्हणून 12 फेब्रुवारी 1922 रोजी चळवळ स्थगित केल्याचे जाहिर केले. 10 मार्च 1922 ला गांधीजींना अटक होऊन सहा वर्षांची शिक्षा झाली.

**मिठाचा सत्याग्रह (1930) दांडी यात्रा**

मार्च 1930 रोजी गांधीजींनी मिठावर कर लावण्याच्या विरोधात सत्यागृह सूरु केला. 12 मार्च ते 6 एप्रिल या काळात मीठ आंदोलन स्मरणार्थ अहमदाबाद ते दांडी, गुजरात असा 400 किमीचा पायी प्रवास (दांडीयात्रा) करण्यात आला. यात हजारो भारतीय सहभागी झाले. भारतातील इंग्रजांची पकड तोडण्यासाठी ही सर्वात यशस्वी चळवळ ठरली. ब्रिटीशांनी 80,000 हून अधिक लोकांना तरुंगात पाठविले.

**हरिजन चळवळ (1933)**

गांधीजींनी अस्पृश्यांना 'हरिजन' असे नाव दिले. 8 मे 1933 रोजी गांधीजींनी हरिजन चळवळीला मदत करण्यासाइी 21 दिवसांचे आत्मशुदधीचे उपोषण केले. अशाप्रकारे गांधीजींनी त्यांच्या हयातीत सुरू केलेल्या सर्व चळवळींनी भारत देशाच्या स्वातंत्र्याला पाठिंबा दिला.

महात्मा गांधींजींची सत्य व अहिंसा ही मूल्ये होती जी मूल्ये माणसाचा संपूर्ण व्यक्तीमत्त्व विकास घडवू शकतात. कारण गांधींजी म्हणतात,

"मूल्यांमधून विचार जन्माला येतात.<br>
विचारांमधून शब्द तयार होतात.<br>
त्यातून तुमच्या कृती घडतात.<br>
कृतीमधून माणसांची व्यक्तीमत्त्वे घडतात.<br>
आणि मूल्ये तयार होतात.<br>
अखेर मूल्येच आपले प्राक्तन लिहितात.

30 जानेवारी 1948 रोजी नथुराम गोडसे याने गांधीजींची हत्या केली. अखेरच्या क्षणीसुध्दा गांधीजींच्या तोंडातून शेवटचे शब्द बाहेर पडले ते म्हणजे 'हे राम' वयाच्या 79 व्या वर्षी हा अहिंसक मार्गाचा प्रणेता अनंतात विलिन झाला.

**निष्कर्ष –**

महात्मा गांधीजींच्या अहिंसक मार्गाची दखल घेऊन जगभरात महात्मा गांधींचा जन्मदिवस (2 ऑक्टोबर) "आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन" म्हणून साजरा केला जातो. रविंद्रनाथ टागोरांनी त्यांना महात्मा ही उपाधी दिली. त्यांच्या कार्याच्या गौरव म्हणून भारताने तसेच जगाने दखल घेऊन रस्त्यांना गांधीजींचे नाव दिले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने 1996 मध्ये महात्मा गांधींचे पोर्ट्रेट प्रदर्शित करून गांधी सिरीजच्या नोटा जारी केल्या. महात्मा गांधीजींचे योगदान शब्दात मोजता येणार नाही. आजही आपण त्यांची तत्वे पालन करून समाजात बदल घडवून आणू शकतो.



Scanned with CamScanner

2022-23

292

ACHARYA JAWADEKAR COLLEGE OF EDUCATION GARGOTI.

ISSN 2277-8063 (Print)
March - 2023
Vol. XII/ Issue. I / 2023
Impact Factor – 8.041

# Navjyot
नवज्योत

## International Interdisciplinary Research Journal
## Science, Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management

*(A Quarterly, High Impact Factor, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*Indexed by:*

Scientific Journal Impact Factor
TOGETHER WE REACH THE GOAL

IIJIF IIJS Cosmos

**Chief Editor**
**Prof. Dr. Ravindra P. Bhanage**
Dept. of Political Science,
Shivaji University,
Kolhapur.

*- Published by-*
**HOUSA Publication**

TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209

IC. Principal
Acharya Jawadekar College of Education,
Gargoti, Dist. Kolhapur.

Scanned with CamScanner

293

# Navjyot

नवज्योत

Impact Factor = 7.958

(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)
NAVJYOT /Vol. XII / Issue - I
ISSN 2277-8063

294
ACHARYA JAWADEKAR COLLEGE OF EDUCATION GARGOTI.

# मूलोद्योगी शिक्षण

संजना संजय भालकर, Ph .D संशोधक शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर
डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई, सहयोगी प्राध्यापक, आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी
ता. भुदरगड ,जि .कोल्हापूर ,महाराष्ट्र.

**सारांश:-** स्वात्यंत्रपूर्व काळात शिक्षणाचा सर्वांगीण विकास करून तत्कालीन शिक्षणपद्धतीमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करणारी थोर व्यक्ती म्हणजे म.गांधीजी होय.गांधीजींचे जीवन व कार्य यांचा परिचय नसलेली व्यक्ती अपवादभूतच! गांधीजी केवळ राजकीय पुढारी नव्हते ,धर्म ,राजकारण ,अर्थकारण ,साहित्य ,कला ,निसर्गोपचार अशा जीवनाच्या सर्वच क्षेत्रात सखोल चिंतन व प्रत्यक्ष प्रयोग करून त्यांनी त्या समस्यांवर प्रकाश टाकला .या शिक्षण क्षेत्र वगळले नाही ,त्यांनी शिक्षणासंबंधी विचार केले असे नव्हे तर संपूर्ण शिक्षण योजना देशाला सादर केली.आज म .गांधीजींची १५३ वी जयंती साजरी करत असताना शैक्षणिक विचारणा उजाळा देण्याची गरज वाटते आहे, त्यामध्ये मूलोद्योगी शिक्षण आजच्या शिक्षणामध्ये महत्वाची आहे.
गांधीजींच्या मते ,सर्वांगीण शिक्षण हे तर शिक्षणाचे महत्वाचे ध्येय आहेच परंतु ते जीवनोपयोगी असावे यावर गांधीजींचा कटाक्ष होता ,ज्या शिक्षणातून आपल्या पायावर उभे राहून पोट भरण्याचे सामर्थ्य व्यक्तीमध्ये निर्माण होऊ शकत नाही त्या माणसाला उपयोगाचं काय असे ते म्हणत.मूलोद्योगी शिक्षणाद्वारे मुलांमध्ये उद्पादन क्षमता निर्माण करण्यामागे ते जीवनोपयोगी ठरावे हा महत्वाचा उद्देश्य होता .या द्यायला महत्व देताना गांधीजी समोर सुशिक्षित बेकार व असंख्य अशिक्षित ,अर्धपोटी अशा दरिद्री समाजाचे चित्र उभे होते व त्यांना जीवन जगण्यास समर्थ करण्यासाठी जे शिक्षण आवश्यक होते ते जीवनोपयोगीच ! जगातील सर्वात उत्तम शिक्षण पद्धती ही फिनलँड देशाची मानली जाते. त्या देशाचे शिक्षण तत्वे जर तुम्ही अभ्यासले तर ते सर्व तत्त्वे मूलोद्योगी शिक्षण या महात्मा गांधीजींच्या शिक्षण तत्त्वाशी मिळतेजुळते दिसतील. यावर आपल्याला अंदाज येऊ शकतो की महात्मा गांधी यांची मूलोद्योगी शिक्षण प्रणाली किती परिणामकारक होती. अजूनही वेळ गेली नसून मूलोद्योगी शिक्षणाचे प्रयोग शाळाशाळांमध्ये व्हायला हवे.तरच आजची शैक्षणिक समस्या सुटू शकतील.

**Keyword** - मूलोद्योगी शिक्षण

**प्रस्तावना:-**

तत्कालीन शिक्षण व्यवस्थेमध्ये गांधीजींना अनेक त्रुटी व दोष जाणवत होते. केवळ कारकून निर्माण करणे,जीवनाशी कसलाही संबंध नसलेले शिक्षण विद्यार्थ्यांच्या डोक्यात कोंबणे ,चरितार्थ संपादनाची पात्रता निर्माण होऊ न देणे ,भावात्मक ,नैतिक ,चारित्रिक गुणांचा विकास होऊ न देणे हे गांधीजींना मान्य नव्हते.देशाची प्रगती आणि स्वांत्र्योत्तर नवसमजनिर्मिती साधायची असेल ,तर शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल झाला पाहिजे .याकरिता गांधीजींनी स्वातंत्र्यप्राप्ती बरोबरच शिक्षण परिवर्तनावर भर दिला.

बुद्धीचा विकास हा तर शिक्षणाचा महत्वाचा विकास आहेच .पण गांधीजींच्या मते हा बुद्धीचा विकास हा केवळ पुस्तकांच्या अभ्यासातून होणार नाही .शिक्षण म्हणजे केवळ साक्षरता नसून शिक्षणातून शारीरिक ,बौद्धिक आणि मानसिक या तिन्हींचा गुणात्मक विकास अपेक्षित आहे त्यासाठी त्यांनी 3H -Head,Heart and Hand हि कल्पना मांडून या तिन्ही अंगांचा विकास शिक्षणातून व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. म.गांधीजींच्या मते, ,"Literacy is not the end of education ,not ever the beginning. By education ,I mean drawing out of the best in man body ,mind and spirit ."

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :- प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे.**

१ .मूलोद्योगी शिक्षण पद्धतीचा अभ्यास करणे.

२.मूलोद्योगी शिक्षण पद्धतीमधील महात्मा गांधीजींच्या विचारांचा अभ्यास करणे.

३.मूलोद्योगी शिक्षण पद्धतीमधील महात्मा गांधीजींच्या शैक्षणिक दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

IC. Principal
Acharya Jawadekar College of Education,
Gargoti, Dist. Kolhapur.



TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209
Scanned with CamScanner

**प्रस्तुत संशोधनाचे महत्व :-** प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक ,माध्यमिक व शालेय स्तरावरील समस्यांचे निराकरण होण्यासाठी उपयुक्त आहे .प्रस्तुत संशोधनामध्ये म.गांधीजींची मूलोद्योगी योजना व त्याद्वारे कृती आधारित अध्ययन याची माहिती मिळविण्यासाठी उपयुक्त ठरेल.

**संशोधनाची परिमर्यादा :-**

प्रस्तुत संशोधन हे म.गांधीजींची मूलोद्योगी शिक्षण यापुरतेच मर्यादित राहील.

**विश्लेषणात्मक विषयविवेचन :-**

मूलोद्योगी शिक्षणाचा अर्थ (basic Education)-इंग्रजीमध्ये basic शब्दाचा अर्थ आहे मूलभूत आणि उर्दूमध्ये या शब्दाचा अर्थ आहे बुनियादी.म्हणूनच या योजनेला 'बुनियादी शिक्षण योजना 'म्हणून ओळखले जाते.मूलोद्योगी शिक्षण योजनेचे स्वरूप जीवनाच्या मूलभूत तत्वावर आधारित असल्याने हे Basic Education आहे .या संदर्भात आचार्य स.ज .भागवत लिहितात ,हि योजना सामन्यात:'वर्धा योजना 'या नावाने ओळखली जाते.या योजनेच्या पुरस्कर्त्यांनी हिला ' मूलोद्योगी राष्ट्रीय शिक्षण ' असे नाव दिले आहे.म. गांधींनी या योजनेला 'Rural National Education through village-handicrafts(ग्रामोद्योगी राष्ट्रीय ग्रामशिक्षण )असे नाव दिले आहे.

**मूलोद्योगी शिक्षणाचे ध्येये:-**

**आर्थिक ध्येय:-**शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या हस्तकौशल्यातून तयार झालेल्या वस्तू विकून त्यातून शाळेचा खर्च भागविणे.मूलोद्योगी शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्याने पुढे तोच उद्योग करून पैसे मिळविणे ,अर्थात भविष्यामधील आर्थिक स्वावलंबन मूलोद्योगी शिक्षणातून अपेक्षित होते.

**नैतिक ध्येय :-** भारतीय विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता निर्माण होण्यासाठी त्यांना नैतिक शिक्षण देणे गरजेचे आहे .सर्व धर्म आणि जातीमधील विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षणाची आवश्यकता आहे.

**सांस्कृतिक ध्येये :-**ब्रिटिशांच्या शिक्षण पध्द्तीमुळे भारतीय विद्यार्थी हे आपली संस्कृती आणि तिचे आदर्श पूर्णपणे विसरले आहेत.त्यांच्यामध्ये भारतीय संस्कृतीचे आदर्श ,परंपरा इत्यादी गोष्टींचे ज्ञान विकसित होण्यासाठी त्यांना संस्कृतीच्या संदर्भात ज्या ज्या गोष्टी येतात ,त्या सर्व शकविणे गरजेचे आहे.म्हणूनच गांधीजींनी सांस्कृतिकतेचे रक्षण करण्यासाठी भारतीय हस्तोद्योगाना मूलोद्योगी शिक्षणामध्ये स्थान दिले.

**नागरिकत्वाचे ध्येय :-**हक्क आणि कर्तव्यांची जाणीव आणि नागरिकांच्या गुणांचे संवर्धन करण्याचे काम मूलोद्योगी शिक्षणामध्ये गृहीत होते

**सर्वांगीण विकासाचे ध्येय :-**त्या काळाच्या पारंपरिक शिक्षणाने विद्यार्थ्यांना फक्त पुस्तकी शिक्षण मिळत असे,ज्यामुळे केवळ साक्षरतेचा विकास होत होता ,गांधीजींच्या मते ,शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या मानसिक ,शारीरिक आणि सामाजिक शक्तींचा सर्वांगीण विकास होय.

**सर्वोदय समाजाच्या स्थापनेचे ध्येय :-**स्वार्थरहित सर्वोदय समाजाची स्थापना करणे हे मूलोद्योगाचे ध्येय होते .सर्वोदय समाजामध्ये श्रमाचे महत्व अनन्यसाधारण होते .स्नेह ,सहयोग ,आत्मबलिदान ,आत्मविश्वास इत्यादी भाव जागृत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात होते.मूलोद्योगी शिक्षण प्रक्रियेतून म.गांधीजींना एक सुसंघटित सर्वोदयी समाज निर्माण करायचा होता.

**मूलोद्योगी शिक्षण पद्धतीची तत्वे :-**

- सर्वसामान्यांचे शिक्षण
- मोफत व सक्तीचे शिक्षण
- स्वावलंबी शिक्षण
- सामाजिक शिक्षण
- कृतिशील शिक्षण
- बालकप्रधान शिक्षण बालमानसशास्त्राचा विचार

**मूलोद्योगी शिक्षण पद्धतीचा अभ्यासक्रम :-** क्रांतिकारी मूलोद्योगी शिक्षण पद्धतीचा अभ्यासक्रम निश्चितच पुरोगामी ,नाविन्यपूर्ण व कृतिशील होणे स्वाभाविक होते.हा अभ्यासक्रम भारतातील नामवंत शिक्षणतज्ज्ञांनी

(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)
NAVJYOT /Vol. XII / Issue - I ISSN 2277-8063

विचारपूर्वक तयार केलेला असल्यामुळे तो जास्तीत जास्त उपयुक्त व सुधारणा घडवून आणणारा झाला असल्यास नवल वाटण्याची गरज नाही .

१.अभ्यासक्रमातील मूलभूत विषय :- १.कृषी २ कातकाम व विणकाम ३ .लाकडी काम ४.चामड्याचे काम ५ .मातीकाम ६.पुस्तक काम ७.मासेपालन ८.फळभाजी काम ९ .स्थानिक भौगोलिक दृष्टीने योग्य असा व्यवसाय.

२ .मातृभाषा

३ .गणित

४ .सामाजिक शास्त्र -इतिहास ,भूगोल ,नागरिकशास्त्र

५ .सामान्य विज्ञान -निसर्गातील घटकांचा अभ्यास ,वनस्पतीशास्त्र

६.कला -संगीत व चित्रकला

७.हिंदी

८ .शारीरिक शिक्षण

**मूलोद्योगी शिक्षण अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये :-**

अभ्यासक्रमाच्या दोन कसोट्या आहेत ,पहिली म्हणजे अभ्यासक्रम राबवित असताना प्रत्येक मुलाला आपल्या सर्व सुप्त शक्तींचा विकास करून घेण्याची संधी मिळाली पाहिजे व दुसरी कसोटी म्हणजे मुलांकडून समाजाच्या ज्या अपेक्षा असतात ,त्या त्याला पूर्ण करता आल्या पाहिजेत.

**१.मूलोद्योग निवडताना स्वातंत्र्य** -स्थानिक गरज आणि अनुकूल वातावरणाचा विचार करून कोणताही मूलोद्योग निवडीचे स्वातंत्र्य होते.म.गांधीजींनी शिक्षणाला पुस्तके आणि वर्गाच्या चार भिंतीतून व कृत्रिम वातावरणातून बाहेर काढून जीवनाभिमुख करण्याचा,तसेच कृतीद्वारे चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**२.शिक्षकास अध्यापन स्वातंत्र्य -** शिक्षकांनी सर्व विषय शास्त्रीय पद्धतींनी शिकवावेत व आपल्या शिक्षण कार्यात सदैव प्रायोगिक दृष्टी ठेवावी.अनुभवाने आणि प्रयोगाने लक्षात येणाऱ्या नव्या सुधारणाही शिक्षकांनी सुचवाव्यात.अध्यापनाचे काम यांत्रिक न होता ,चैतन्यशील व्हावे अशी अपेक्षा.

**३.समवाय पद्धतीने शिक्षण** :-वेगवेगळ्या विषयामध्ये समवाय साधत असताना एका विषयकडून दुसऱ्या विषयाकडे घ्यावयाची झेप हि नैसर्गिक व सहज वाटली पाहिजे.शिक्षणातील वेगवेगळे विषय ,शिक्षण आणि जीवन यामध्ये समवाय प्रस्थापित करावा.

वेगवेगळ्या विषयामध्ये समवाय साधत असताना एका विषयकडून दुसऱ्या विषयाकडे घ्यावयाची झेप हि नैसर्गिक व सहज वाटली पाहिजे.शिक्षणातील वेगवेगळे विषय ,शिक्षण आणि जीवन यामध्ये समवाय प्रस्थापित करावा.

स्वाश्रयी शिक्षण मूलोद्योगातून वस्तू विकून त्या पैशांतून शाळेचा खर्च भागेल अशी नवीन योजना या अभ्यासक्रमात होती.म.गांधीजींच्या मते,शाळा ही स्वाश्रयी असली पाहिजे.परंतु ती आवश्यक अट मानू नये.

**५ सामाजिक व नैतिक विकास** :-या अभ्यासक्रमाचे आणखी एक वैशिष्ठ म्हणजे त्याच्यात विद्यार्थ्यांच्या सामाजिक व नैतिक विकासाला अधिक वाव दिला आहे.विविध सामाजिक सांस्कृतिक उपक्रम सुचविले आहेत.निरनिराळे सण,समारंभ ,जयंत्या ,पुण्यतिथ्या ,राष्ट्रीय उत्सव ,साक्षरता प्रसार ,ग्राम सफाई ,सहली ,भेटी ,भाषणे ,चर्चा ,वाद -विवाद ,सामुदायिक प्रार्थना इ.उपक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांचा सहभाग घ्यावा .यादृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारी निर्माण होईल.

**मूलोद्योगी शिक्षण पद्धतीचे मूल्यांकन :-** मूलोद्योग पद्धतीची तत्त्वे, अभ्यासक्रम आणि अध्ययन-अध्यापन पद्धती तज्ञांना मान्य असूनही ती सक्रिय रीत्या अंमलात आली नाही. गांधीजींनी सांगितलेल्या पद्धतीचा कोठारी आयोगाने पुरस्कार न केल्यामुळे ही पद्धती आपोआपच मागे पडली. जातीवर आधारलेली भारतातील समाजव्यवस्था आणि कष्टाचे काम विशिष्ट जातीनेच करण्याची परंपरा मूलोद्योग शिक्षणप्रसाराच्या आड आली. हस्तकला हा मूलोद्योग पद्धतीचा प्राण. प्रत्यक्षात मात्र हस्तव्यवसायाकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे मुलांमध्ये जी कौशल्ये संक्रमित व्हावीत, ती झाली नाहीत. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपर्यंत मूलोद्योग शाळांतील मुलांची संख्या वेगळी दाखविली जात असे.

त्यानंतर शासकीय कागदपत्रात मूलोद्योग पद्धतीचा उल्लेख आढळत नाही. ही पद्धत आता इतिहास जमा झाली आहे.

**संशोधनाचे निष्कर्ष :-**

म.गांधीजींनी आपल्या शैक्षणिक विचारांमध्ये केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे; शिक्षणाचा प्रारंभ देखील नव्हे ,आत्मा व मन यांचा परिपूर्ण विकास करून व्यक्तीमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती हे शिक्षणाचे ध्येय आहे . केवळ कारकून निर्माण करणारे ,जीवनाशी कसलाही संबंध नसणारे शिक्षण विद्यार्थ्यांना देणे,चरितार्थ संपादनाची पात्रता नसणारे शिक्षण या दोषांना दूर करण्यासाठी, 3H-Head ,Heart and Hand ही संकल्पना मांडली व या सर्व अंगांच्या विकासावर भर द्यावा असे सुचविले . पारंपरिक शिक्षणाऐवजी मूलोद्योगी शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला होता.

आज आपल्याला कोविड-१९ च्या प्रसार व अन्य संसर्गजन्य रोगराई, आपत्ती व बदलती परिस्थिती लक्षात घेऊन म.गांधींनी प्रेरित मूलोद्योगी शिक्षणामधील कृती आधारित अध्ययन ,सहली ,समाजउपयोगी साधने निर्माण करणे,जयंत्या,स्वछता अभियान,राष्ट्रसेवा या व अशा विविध शैक्षणिक पध्द्तीचा उपयोग होताना दिसत आहे.

**शिफारशी :-संशोधिकेने पुढील शिफारशी मांडल्या आहेत.**

१.आजच्या शिक्षणामध्ये मूलोद्योगी शिक्षणामधील शिक्षण पद्धतींचा उपयोग करण्यात यावा.

२.म.गांधीजींच्या विचाराप्रमाणे मुलांना आशय योग्य प्रकारे समजण्यासाठी विविध शैक्षणिक पद्धती अध्ययन - अध्यापन कार्यात अमलात आणाव्यात.

**संदर्भ :-**

1. वास्कर आनंद, वास्कर पुष्पा, (२००८);भारतीय शिक्षणाचे बहुजनीकरण, पुणे: नित्य नूतन प्रकाशन.
2. पाटील सतीश (एप्रिल २०२२);शैक्षणिक व्यवस्थापन व प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन, पुणे:निराली प्रकाशन.
3. कुंडले म.बा,(२०१२ );शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, पुणे: श्रीविद्या प्रकाशन.
4. http://www.education.gov.in 29july 2020 retrived on 08 Feb 2023.
5. http://www.mr.vikaspedia .in 2020 retrived on 08 Feb 2023.
6. http://vishwakosh.marathi.gov.in retrived on 07Feb 2023.

TRUE COPY

Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209

296

ISSN 2277-8063 (Print)
March - 2023
Vol. XII/ Issue. I / 2023
Impact Factor – 8.041

# Navjyot
नवज्योत

## International Interdisciplinary Research Journal
## Science, Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management

*(A Quarterly, High Impact Factor, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*Indexed by:*

Scientific Journal Impact Factor
TOGETHER WE REACH THE GOAL

IIJIF IIJS Cosmos

**Chief Editor**
**Prof. Dr. Ravindra P. Bhanage**
Dept. of Political Science,
Shivaji University,
Kolhapur.

*- Published by-*
HOUSA Publication

Scanned with CamScanner

(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)
NAVJYOT / Vol. XII / Issue – I
ISSN 2277-8063

# मुलोद्योगी शिक्षणविषयक तत्त्वांचा राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 वरील प्रमाव

डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई
सहयोगी प्राध्यापिका
आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र
महाविद्यालय, गारगोटी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

श्रीमती विमल अंकुश कोळी
संशोधक विद्यार्थी
सावित्रीबाई फुले महिला
शिक्षणशास्त्र महाविद्यालय नेठ वडगांव सलग्नित

**सारांश :**भारताचे 'राष्ट्रपिता' म्हणून ओळखले जाणारे महात्मा गांधी. त्यांचे पुर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी गांधीजी एक युगपुरूष म्हणून ओळखले जातात. अहिंसेच्या मार्गाने जात असताना जनतेत देशाविषयी प्रेमभावना जागृत केली आत्मविश्वास निर्माण केला. तसेच लोकांमध्ये असणाऱ्या क्षमतांची जाणीव करुन दिली राजकीय क्षेत्राबरोबरच शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी मोलाचे योगदान दिले. देशाला त्यांनी मुलोद्योगी शिक्षण योजनेची ओळख करुन दिली. शिक्षणाचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला भारतीय समाजात त्यांनी श्रमाला महत्त्व प्राप्त करुन दिले. प्रत्येक व्यक्तिस शारीरिक श्रमाची महती पटवून देण्याचा प्रयत्न केला. म्भंकए म्ंदकए म्भंतज च्या विकासावर भर दिला.उद्योगांच्या विकेंद्रीकरणावर भर दिला हस्तउद्योगाला महत्त्व प्राप्त करुन दिले. श्रमाचे महत्त्व स्वाक्षरी योजणेचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्नदिले. महात्मा गांधीजींनी कृतीयुक्त शिक्षणाचा पुरस्कार केला. आजच्या राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये कृतीद्वारा शिक्षण,हातव्यवसाय, अनुभवावर आधारित शिक्षण आणि नानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी, समान आणि न्याय समाज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहेत्र रोजगाराची परिस्थिती आणि वैश्विक परिसंस्था वेगाने बदलत असताना, मुलांनी केवळ शिकणेच महत्त्वाचे ठरणार नाही तर कसे शिकायचे हे शिकणे जास्त महत्त्वाचे ठरणार आहे. शिक्षण अधिक अनुभवात्मक, सर्वसमावेशक, एकात्मिक, जिज्ञासू संशोधन केंद्रीत लवचिक आणि अर्थातच आनंददायक होण्यासाठी अध्यापनशास्त्र उकांत होण्याची गरज आहे.

शिकणाऱ्यांचे सर्व पैलू आणि क्षमता विकसित होण्यासाठी शिक्षण हे सर्व दिशांनी विकसित होण्यासाठी उपयुक्त आणि शिकणाऱ्यासाठी अधिक समाधानकारक होण्यासाठी अभ्यासक्रमात विज्ञान आणि गणिताच्या बरोबरीनेच मूलमूत कला,हस्तकला,मानशशास्त्रे खेळ, किडा, आणि स्वास्थ, माषा, साहित्य, संस्कृती आणि नूल्ये यांचा समावेश असणे अत्यावश्यक आहे. शिक्षणामुळे चारित्र्य घडले पाहिजे आणि त्यायोगे शिकणारे नीतिवान, तर्कशुद्ध, सहानुभुतीशील आणि सदृश्य बनतील आणि त्याचवेळी ते विद्यार्थी लाभदायी आणि समाधानकारक रोजगार मिळवण्यासाठीही तयार होतील. हिच तत्त्वे राष्ट्रीय धोरण 2020 मधील प्रस्तावनेमध्ये आहेत म्हणूनच सदर विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**प्रस्तावना :–** महात्मा गांधीजींचे असे मत होते की, साक्षरता हे शिक्षणाचे एक साधन आहे व त्याच्या सहाय्याने भारतीय समाजाला शिक्षित केले पाहिजे. केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे शिक्षणातून शारीरिक, बौध्दिक आणि मानसिक विकास अशा तिन्ही प्रकारचा विकास होणे अपेक्षित आहे. त्यासाठी 3भ ची कल्पना मांडली होती. ;3भ त्र भ्भंकए म्ंदकए भ्भंतजद्ध त्यांच्या मते शिक्षण हे स्वावलंबी झाले पाहिजे व शिक्षणातून व्यक्तीच्या शरीर, मन, व आत्म्याचा विकास झाला पाहिजे शिक्षणातून पोट भरण्याचे व जीवनातील समस्या सोडविण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्याच्या अंगी आले पाहिजे. यासाठीच्या विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासासाठीच्या पुस्तकी ज्ञानाबरोबरच त्याला एखाद्या व्यवसायाचे ज्ञान दिले पाहिजे. शिक्षणातून दुसऱ्याचे दुःख जाणून घेण्याची क्षमता निर्माण झाली पाहिजे. हे गांधीजींचे विचार वास्तवाला धरुनच होते. त्यामुळे ते सर्वांना पटण्यासारखे होते म्हात्मा गांधीजी यांनी स्वावलंबन, स्वाभिमान, श्रमप्रतिष्ठा या त्रीसुत्रीवर आधारित नुलोद्योग शिक्षण योजना तयार केली.

इ.स. 1937 मध्ये वर्धा परिषदेत आपले शिक्षणविषयक विचार मांडले. या योजनेची वैशिष्ट्ये म्हणजेच म. गांधींचे शिक्षणविषयक विचार होत. शिक्षणाचे माध्यम मातृमाषा असावे शिक्षण मोफत व सक्तीचे असावे शिक्षणात हातव्यवसायास प्राधान्य असावे. शिक्षणामध्ये समन्वयाचे तत्त्व असावे. शिक्षण मानसशास्त्रावर आधारित असावे विद्यार्थ्यांच्या सामाजिक व नैतिक विकासाची सोय करण्यात आली होती. विविध प्रकारच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा अंतर्भाव करण्यात आला होता. सण, समारंभ, जयंत्या, पुण्यतिथी राष्ट्रीय उत्सव हे कार्यक्रम विद्यार्थ्यांनी संयोजित करुन त्यात समाजातील लोकांनाही सहभागी करुन शाळा व समाजजीवन यांचा परस्परसंबंध प्रस्थापित करणे. कोणतीही शैक्षणिक योजना ही निर्मात्याच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानातून निर्माण होते. गांधीजींच्या नुलोद्योगी शिक्षणयोजनेचाही त्याच्या जीवनविषयक तत्वज्ञानाशी निकटचा संबंध आहे. कमीत कमी गरजांवर आधारलेले साधे, त्यागनय भौतिक जीवन परंतु उदात्त विचारांनी परिपूर्ण असे आध्यात्मिक संपन्न जीवन हेच आदर्श जीवन अशी त्यांची धारणा होती.

**संशोधनाची उद्दिष्टे :–**1. मुलोद्योगी शिक्षणाचा 21 व्या शतकातील शिक्षणाच्या तत्वावरील प्रभाव अभ्यासणे.

2 मुलोद्योगी शिक्षण योजनेतील अभ्यासक्रमांचा 21 व्या शतकातील अभ्यासक्रमांवर पडलेला प्रभाव अभ्यासणे.



TRUE COPY
IC. Principal
Acharya Jawadekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur.
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209
ACHARYA JAWADEKAR COLLEGE OF EDUCATION GARGOTI.
297
Scanned with CamScanner

3. मुलोद्योगी शिक्षण योजनेतील 21 व्या शतकातील शिक्षणावरील ध्येयांवर पडलेला प्रभाव अभ्यासणे.

**संशोधनाचे महत्त्व :**

1. मुलोद्योगी शिक्षण योजना ही शिक्षणात बालकांच्या कृतीशीलतेवर आणि इंद्रियेद्वारा बुद्धिविकासावर भर देते यामध्ये शिक्षणाच्या आणि जीवनाच्या गरजा यांचा संबंध जोडला आहे.
2. भारतीय शिक्षणप्रणालीमध्ये राष्ट्रीय शिक्षणाची योजना सादर करताना गांधीजींच्या 'मूलमूत' शिक्षणातील तत्त्वांच्या आधारे आपली योजना आखली आहे.
3. महात्मा गांधीजींच्या शिक्षणविषयक क्रांतिकारी कल्पनांच्या आधारे आजच्या युगाची आव्हाने आपण राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मधुन पुर्ण करु शकतो.
4. गांधीजींच्या शैक्षणिक विचारात निसर्गावर कार्यवाद आणि आदर्शवाद यांचा समन्वय साधलेला दिसून येतो. गांधीजी पुस्तकी ज्ञानाला महत्त्व न देता कृतीद्वारे शिक्षणाचा पुरस्कार केला. कृतीद्वारे शिक्षणाला महत्त्व आले आहे.
5. लोकशाही शासन पद्धतीमध्ये सुजान नागरिकाची भूमिका महत्त्वपूर्ण असते शाळांमधून बालकांना आदर्श नागरिकत्वाचे धडे मिळावेत, आर्थिक, राजकीय, सामाजिक,सांस्कृतिकदृष्ट्या आदर्श नागरिक निर्माण व्हावेत यासाठी मुलोद्योगी शिक्षणाचे महत्त्व आहे.
6. मुलोद्योगी शिक्षण योजनेमध्ये विद्यार्थी ज्या गोष्टी शिकत असतो त्यांचा संबंध घर, गाव, आणि आजूबाजूच्या परिसराशी आला पाहिजे. म्हणजेच समन्वयाचे तत्त्व जे आजही राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये आले आहे.
7. 21 व्या शतकातील शिक्षण हे सर्जनशील, चिकित्सक, विचार, सहयोग, सहकार्य आणि संवाद यावर भर देते. हे तत्त्व मुलोद्योगी शिक्षणामध्ये महात्मा गांधीजींनी मांडले आहे.
8. मुलोद्योगी शिक्षण योजनेमध्ये शिक्षणाचा संबंध हा अभ्यासक्रम किंवा पाठयपुस्तकांशी नसून जिवंत अनुभवांशी असतो अशा अनुभवाधारित शिक्षणपद्धतीचा मुलगामी विचार करणाऱ्या निवडक विचारवंतांपैकी महात्मा गांधी प्रमुख नाव आहे.
9. मुलोद्योगी शिक्षणामध्ये हस्तकला, कला, आरोग्य आणि शिक्षण या चार गोष्टींचा अतिशय सुरेख मेळ घातला आहे.

संशोधनाची परिमर्यादा :–

1. मुलोद्योगी शिक्षणातील सर्वसामान्यांचे शिक्षण, मोफत व सक्तीचे शिक्षण, कृतीशील शिक्षण या तत्त्वांपुरते मर्यादित आहे.
2. मुलोद्योगी शिक्षणातील अभ्यासक्रमांमधील मातृभाषा आणि हस्तव्यवसायांपुरते मर्यादित आहे.
3. मुलोद्योगी शिक्षणातील सर्वांगीण विकास, कृतीद्वारे शिक्षण आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे या ध्येयापुरते मर्यादित आहे. विश्लेषणात्मक विषय विवेचन

उद्दिष्टे :– 1 महात्मा गांधीजींना भारतासमोर असलेल्या प्रश्नांची जाणीव झाली होती. समाजामध्ये निरक्षरता होती सर्वसामान्य जनतेला साक्षर करणे हा या योजनेचा हेतू होता. स्वतंत्र्य भारत घडविण्यासाठी कर्तृत्त्वान नागरिक निर्माण करण्यासाठी जनतेला शिक्षित करणे गरजेचे होते तसेच 7 ते 14 वयोगटातील मुलामुलींना शिक्षण मोफत व सक्तिचे करावे शिक्षण मोफत असल्याने बहुजन समाजीतील गरीब मुलामुलींना लाभ घेताना सुलभ जाईल. आर्थिक चणचण भासणार नाही. शिक्षण घेण्याचा सर्वांना समान अधिकार आहे. जाती, धर्म, पंथ, लिंग यानुसार भेदभाव न करता सर्वांना शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात यावी. महात्मा गांधीजींनी 1937 साली हा विचार मांडला होता तो भारतीय संविधानाच्या कलम 21 अ अंतर्गत 6 ते 14 वर्षे वयोगटातील बालकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण उपलब्ध करण्याची तरतूद 1 एप्रिल 2010 रोजी हा कायदा भारतात अस्तित्वात आला आणि शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत अधिकार असल्याचे मान्य करणाऱ्या 135 देशाच्या यादीत भारताला स्थान मिळाले.

कृतीशीलतेला वाव आहे केवळ श्रवण, वाचन, लेखन या कौशल्यांचा. शरीर अवयवंचा विचार न करता विद्यार्थ्यांच्या कृतीला प्राधान्य आहे महात्मा गांधीजी म्हणतात." खरे बौदिधक शिक्षण हे हात – पाय, डोळे, नाक इ. योग्य वापरातून होऊ शकते. त्यामुळे सध्याच्या शिक्षणात कृतीला व ज्ञानरचवादाला महत्त्व आले आहे.

उद्दिष्टे :– 2

मातृभाषा शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे गांधीजी शिक्षणाच्या माध्यमाविषयी इंग्रजीचे कट्टर विरोधी होते. बालकाचा योग्य विकास करण्यासाठी त्यास योग्यप्रकारे लिहता, वाचता व बोलता आले पाहिजे लहान मुलांना आपल्या घरातील भाषा / मातृभाषेत अवघड संकल्पना अधिक लवकर समजतात. नवीन शैक्षणिक धोरणावर इयत्ता 8 वी इयत्तेपर्यंत शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असली पाहिजे तसेच स्थानिक भाषा / प्रादेशिक भाषा यांचाहि अभ्यास अभ्यासक्रमामधे आला आहे विज्ञानसहित सर्व विषयांची उच्च – दर्जाची पाठ्यपुस्तके घरातील / मातृभाषेत उपलब्ध करुन दिली जातील बालकाकडून बोलली जाणारी भाषा आणि शिकविण्याचे माध्यम यात तफावत येता कामा नये. शिक्षणात हस्तकला उद्योगाला प्राधान्य देण्यात यावे हस्तकलेच्या आधारे शिक्षण, दिल्याने बालकाच्या अवयवांना हालचाल करण्याची संधी मिळते शिक्षण हस्तकलेवर आधारित दिले गेले पाहिजे त्यामुळे बालकास सामुहिकरुपाने कार्य करण्याची संधी उपलब्ध होते. मुलोद्योगी शिक्षणातून बालकाच्या मानसिक शक्तीचा विकास होण्यास मदत होते. सध्याच्या 21 व्या शतकातील शिक्षणामध्ये इयत्ता 6 वी ते 8 वी च्या दरम्यान प्रत्येक विद्यार्थ्यांने, राज्य आणि स्थानिक समुदायाने ठरवलेला आणि स्थानिक कौशल्य आधारित एक

298

मजेदार अभ्यासक्रम निवडायचा आहे त्यामुळे त्यांना सुतारकाम, इलेक्ट्रीकचे काम, धातूकाम, बागकाम, कुंभारकाम यासारख्या महत्त्वपूर्ण व्यावसायिक कलांचा प्रत्यक्ष अनुभव मिळेल आणि कामाची पाहणी करता येईल छब्थ् 2020 . 21 ची निर्मिती करताना छब्थ्ज् कडुन 6 ते 8 साठी सरावावर आधारित अभ्याक्रमाची योग्य रचना केली जाईल

**उद्दिष्टे :–3.** शिक्षणाचे सर्वात मुलभुत ध्येय म्हणजे बालकाचा सर्वांगीण विकास करणे होय. विद्यार्थ्यांचा शिक्षणातून शारीरीक, मानसिक, भावनिक विकास करता यायला हवा ते बुदधी ;भ्मंकद्ध भावना ;भ्मंतजद्ध आणि हस्त ;भ्ंदकद्ध याद्वारे ज्ञानात्मक,भावनात्मक आणि कियात्मक विकास करण्यावर आधीक भर 21 व्या शतकातील शिक्षणाच्या महत्त्वकांक्षी उदिष्टांशी सुसंगत अशा नवीन प्रणाली मध्ये व्यक्तीच्या सृजनक्षमतेच्या विकासावर भर आहे शिक्षकाने केवळ आकलनक्षमता विकसित केल्या पाहिजेत असे नाही तर साक्षरता आणि संख्याज्ञान या मूलभूत क्षमता आणि उच्चदर्जाच्या तार्किक समस्या निराकरण क्षमताच नव्हे तर सामाजिक, नैतिक आणि भावनिक क्षमतांचा विकाससुद्धा केला पाहिजे.माणूस समाजशील प्राणी आहे समाजात राहून आपले कार्य करतो. म्हणून समाजाशिवाय व्यक्तिची प्रगती व व्यक्ती विकासाशिवाय समाजाची तसेच राष्ट्राची प्रगती होऊ शकत नाही. म्हणून समाज आणि व्यक्ती यांची ध्येये परस्परपूरक ठरतात. याकरिता बालकां मध्ये जबाबदारीची जाणीव शिक्षणाने निर्माण करणे आवश्यक आहे.

योग्य कृतीद्वारे शिक्षण दिले जावे गांधीजींच्या मतानुसार शिक्षणाचा अर्थ केवळ बालकांच्या डोक्यात ज्ञान कोंबणे नव्हे तर शेंद्रियांचा वापर करणे हा आहे. प्रत्यक्ष कृतीने बालकाने जे ज्ञान मिळते व अनुभव मिळतो त्यास खरे शिक्षण म्हणता येईल कृतिद्वारे शिक्षण दिल्याने लोकांच्या मनाने काम करण्याप्रती प्रतिष्ठेची भावना निर्माण होईल व ते शारिरिक कामे करण्यात पुढे सरसावतील 'करवा आणि शिका' हे सुत्र यास तंतोतंत लागू पडते सध्याच्या शिक्षणामध्ये प्रायोगिक पद्धती, क्षेत्रभेटी, प्रकल्पपद्धतीने अध्यापन केले जाते नाटयीकरण, वादविवादअध्यापन पद्धती. मुलांच्या सर्जनशीलतेला वाव देणाऱ्या साठी विज्ञानप्रदर्शन भरविली जातात.

आजच्या शिक्षण पद्धतीनेही मुलोद्योगी पद्धतीतील विचार स्वीकारले पाहिजेत कृतीद्वारा शिक्षण व्यावसायिक शिक्षण समन्वय या तत्त्वांचा आज शिक्षणात अवलंब केला जातो. मुलोद्योगी शिक्षण योजना भारतीय शिक्षण शिक्षण प्रणालीला मिळालेली एक मौलिक भेट आहे. भारतीय शिक्षण प्रणालीत अमुलाग्र बदल करण्याच्या हेतूने गांधीजींनी ही योजना मांडली. भारतीय कृषीआधारित अर्थव्यवस्था असल्याने कृषीला पुरक हस्तउद्योगाचे शिक्षण विद्यार्थ्यांना दिले तर मनुष्यबळाचा योग्य वापर होऊन देशाच्या आर्थिक विकासालाही हातभार लागेल, अध्यात्मावर, निसर्गावर, आणि कार्यवाड अशा त्रिवेणी संगमाचा अंगिकार असणारी ही योजना गरजाधिष्ठीत अभ्यासक्रमानुसार आधारित होती. जगतील सर्वात उत्तम शिक्षण पद्धती ही फिनलॅंड देशाची मानली जाते या देशाची शिक्षण तत्वे महात्मा गांधीजींच्या शिक्षण तत्वाशी मिळती जुळती आहेत. त्यामुळे अशा परिणामकारक शिक्षण पद्धतीची समाजास गरज आहे. शिक्षणातून निर्माण होणारी बेरोजगारी सारखी भयानक समस्या थांबवता येईल.

**निष्कर्ष :–** 1. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये मुलोद्योगी शिक्षणाची तत्वे आहेत.

2. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मधील अभ्यासक्रमांमध्ये मुलोद्योगी शिक्षण योजनेचा प्रभाव आहे.
3. मुलोद्योगी शिक्षण योजनेतील ध्येये व धोरण यांचा प्रभाव राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 वर पडलेला आहे.

**शिफारशी :–** वरील संशोधनावरुन संशोधिकेने पुढील शिफारशी मांडल्या आहेत.

1. शिक्षकांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ची अंमलबजावणी करत असताना मुलाद्योगी शिक्षण पद्धतीचा नव्याने अभ्यास करावा.
2. प्रत्येक शिक्षण संस्थेमध्ये शासनाने स्थानिक परिसरातील गरजानुसार हस्तव्यवसाय लघुउद्योग इ. शिक्षणाची सोय करावी.
3. शासनाने कृतीयुक्त शिक्षणपद्धतीची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य साधने पुरवावीत.
4. कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रम राबवण्याचे कृषीविद्यापीठे, व्यावसायिक शिक्षण देणारे विद्यापीठे स्थापना करावीत.
5. स्वावलंबनासाठी शिक्षण व उदरनिर्वाहासाठी शिक्षण ही दोन्ही तत्वे अभ्यासक्रमामधून साध्य करण्यात यावी.

संदर्भग्रंथ :–


- कुंडले. म. बा.;2003 शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र.
- घोरमोडे. के. यु. घोरमोडे कला ;2006द्ध शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य, विद्याप्रकाशन रुईकर रोड, महाल, नागपूर
- जाधव मोहन, भोसले आरती, सरपोतदार प्राची 2003 भारतीय शिक्षणाचा विकास. फडके प्रकाशन कोल्हापूर.
- राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 शिक्षण मंत्रालय, भारत सरकार.
- Best, J. W. and Khan, J.V. ( 2005) Research in Education ( 9th eds) Delhi. Prentice Hall Indian
- Shodhaganga. Inflibnet.ac.in Retriened.on feb. 2023
- https: // www. mr. wikipedia.in Retrieved on feb.2023




Scanned with CamScanner

299

ISSN 2277-8063 (Print)
March - 2023
Vol. XII/ Issue. I / 2023
Impact Factor – 8.041

# Navjyot नवज्योत

## International Interdisciplinary Research Journal
## Science, Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management

*(A Quarterly, High Impact Factor, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*Indexed by:*

Scientific Journal Impact Factor
TOGETHER WE REACH THE GOAL

IIJIF iiJS Cosmos

**Chief Editor**
**Prof. Dr. Ravindra P. Bhanage**
Dept. of Political Science,
Shivaji University,
Kolhapur.

*- Published by-*
**HOUSA Publication**

Scanned with CamScanner

(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)
NAVJYOT /Vol. XII / Issue – I
ISSN 2277-8063

300

ACHARYA JAWADEKAR COLLEGE OF EDUCATION GARGOTI.

# महिला सक्षमीकरणविषयक गांधीजींच्या मतांचा अभ्यास

सुप्रिया संभाजी चौगले, संशोधक विद्यार्थिनी, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर
प्रा.डॉ.प्रतिभा सदाशिव देसाई , सहयोगी प्राध्यापिका, आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र, महाविद्यालय, गारगोटी कोल्हापूर,महाराष्ट्र ,शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संलग्नित

**सारांश**

सक्षमीकरण म्हणजे कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक,सामाजिक,शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रामध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे. विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे आणि स्त्री पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेलाच स्त्री सक्षमीकरण असे म्हणतात. महात्मा गांधी हे महिला उदारीकरण आणि सक्षमीकरणाचे पुरस्कर्ते होते.तसेच त्यांनी लैगिक समानतेवर भर दिला एक समाजसुधारक म्हणून त्यांना सामाजिक सुसूत्रता आणायची होती आणि भारताला जागतिक स्पर्धेत सक्षम बनवायचे होते त्यामुळे त्यांनी स्त्री सक्षमीकरणाला प्राधान्य दिले.

**Key Word** : महिला सक्षमीकरण, महात्मा गांधीजींच्या मते,अभ्यास

**प्रस्तावना :** भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महात्मा गांधीजींचे महत्त्वाचे योगदान आहे. महात्मा गांधींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याबरोबरच भारताची सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक,सांस्कृतिक,कौटुंबिक परिस्थिती सुधारण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यांनी स्वातंत्र्यपूर्व कालावधीमध्ये सर्व भारताचा दौरा केला व भारतातील वातावरण जाणून घेवून त्या दिशेने पाऊल उचलले. निर्णय क्षमता,नेतृत्व क्षमता व दूरदृष्टी इ. गुण असल्याने त्यांना भारतातील पार्श्वभूमी समजण्यास अधिक सुलभता आली. तसेच त्यांचे ध्येय अन्याय व हिंसेला कायमचा आळा घालणे हे होते.दक्षिण आफ्रिकेत बॅरीस्टर पदवी संपादन करण्यासाठी गेलेल्या गांधींना समाजाच्या विकलांगाची ओळख झाली भारतीय धर्म आणि संस्कृती यामध्ये असलेल्या गुंतागुंतीच्या समस्यापासुन आपण दूर आहोत याची महात्मा गांधींना जाणीव झाली. यामुळे दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना दिली जाणारी हीनतेची वागणुकीबाबत त्यांनी आवाज उठवला व त्याचवेळी त्यांना भारत समजला असे म्हंटलं तरी वावग ठरणार नाही. आफ्रिकेमध्ये चाललेली वर्णपद्धती व वर्गपद्धती यामुळे त्यांना सतत अपमानास्पद वागणुकींना सामोरे जावे लागत असे.

इ.स.१९१५ मध्ये गांधीजींनी भारतदौरा केला यातून भारतातील लोकांवर होणार अन्याय,अत्याचार त्यांनी जवळून पाहिला एक भारतीय राष्ट्रवादी, थिओरिस्ट आणि संघटक अशी त्यांची ख्याती होती यावेळी गांधीजींचे राजकीय गुरु गोपाळ कृष्ण गोखले यांनी महात्मा गांधीना भारताची ते भारतात येण्यापूर्वीची व भारतात आल्यानंतरची परिस्थिती समजावून सांगितली.

**महात्मा गांधीजींची एकादश तत्त्वे :**

१.अहिंसा २.सत्य ३.अस्तेय ४.ब्रह्मचर्य ५.अपरिग्रह ६.शरीरश्रम ७.आस्वाद ८.निर्भयता ९.सर्वधर्मसमभाव १०.स्वदेशी ११.अस्पृश्यतेचा त्याग

या तत्त्वांच्या आधारे महात्मा गांधींनी भारतीय चळवळी, आंदोलन केली व भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. भारतीय संस्कृती ही पितृसत्ताक असल्यामुळे त्यांना कौटुंबिक परिस्थिती माहिती होती.

भारतामध्ये सती प्रथा, हुंडा प्रथा, बालविवाह, जरठ कुमारी विवाह, विधवा विवाह, केशवपण अशा क्रुर व स्त्रियांवरील अन्यायकारक प्रथा अस्तित्वात होत्या यामुळे अन्यायाची, अत्याचाराची व हीनतेची वागणूक स्त्रियांना दिली जात होती.थोडक्यात दुय्यमतेच्या वागणुकीमध्ये स्त्रिया भरडल्या जात होत्या चूल आणि मूल असे मर्यादित जीवन त्या जगत होत्या आणि या सगळयाला त्या आपले कर्तव्य समजत होत्या आणि त्यामुळे आणखीच मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत होते यासाठी गांधीजींनी पहिला बदल हा स्त्रीयांच्या विचारांमध्ये केला व त्यांना चळवळींमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले यामुळे स्त्रीया घराबाहेर पडल्या व समाजाला जवळून पाहू लागल्या यामुळे हळूहळू त्यांच्या विचारात बदल झाले व स्त्री सक्षमिकरणाला चालना मिळाली

Desai
IC. Principal
Acharya Jawadekar College of Edu
Gargoti, Dist. Kolhapur.

TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209



Scanned with CamScanner

**विषय विवेचन :**

**महात्मा गांधी यांची स्त्रियांविषयक मते**

२०व्या शतकाच्या पूर्वार्धात महिलांच्या स्थितीत क्रांतिकारक बदल घडवून आणण्याची महत्वाची भूमिका महात्मा गांधी यांनी केली.त्यांचा उदारीकरण व देशाचा सर्वांगीण विकासावर जास्त भर होता समाजाला घडवण्याचे कार्य हे कुटुंबातुन होते असा त्यांचा ठांब विश्वास होता. समाजातील मध्यम व पीडित वर्गांमधून बदल घडवून आणणे जास्त महत्वाचे होते महात्मा गांधींच्या आई पुतलीबाई यांनी त्यांना लहानपणापासून आध्यात्मिक शिक्षण दिले गांधींच्या मते,नैतिकता आणि अध्यामाच्या आधारावर स्त्रिया पुरुषांपेक्षा वरचढ आहेत देशाच्या आर्थिक,सामाजिक,राजकीय,मुक्तिमध्ये स्त्रियांचा मोठा वाटा आहे. अहिंसेसाठी महिलांच्या जन्मजात सक्षमतेवर गांधीचा मोठा विश्वास होता म्हणून भारतीय चळवळीमध्ये स्त्रियांचा सहभाग त्यांनी वाढवला.

**स्त्री सक्षमीकरणाच्या प्रश्नावर गांधीजींचे कार्य**

**१.विधवा पुनर्विवाह :** अनिष्ट सामाजिक रूढी,परंपरा यांना रोखण्याचे/थांबवण्याचे काम महात्मा गांधींनी केले. महात्मा गांधींच्या मते,ज्या विधवेस मुले आहेत लग्नाच्या शपथेमधून बाहेर पडेल पाहिजे तिने पुनर्विवाहाचा विचार केला पाहिजे. गांधीजींच्या मते,आपण भारतीय धर्माच्या नावावर गोरक्षणासाठी ओरडतो पण संरक्षण नाकारतो आम्ही धर्माच्या नावाखाली अनिष्ट रूढीना बांधून ठेवतो जे की अमानवी कृत्य आहे धर्माच्या नावाखाली लहान मुलींवर वैधव्य/ ज्यांना वैधव्य म्हणजे काय याचा अर्थ माहीत नसतो अश्या मुलींवर आपण आपल्या रूढी परंपरा लादतो.

**२.बालविवाह :** खेळण्याच्या वयात लग्न झाल्याने मुलींना जबाबदारी व कर्तव्याची जाणीव नसते त्यामुळे त्यांची मानसिक व भावनिक अवहेलना होते तसेच मानसिक,शारीरिक व भावनिक छळ देखील होतो बालविवाहास महात्मा गांधी यांनी "अब इनशीओ" म्हणजेच शून्य म्हंटले आहे आणि शून्य म्हणजे विवाह किवा लग्न नव्हे सुधारणा या हळूहळू होतात त्यामुळे महात्मा गांधी यांनी विधवा पुनर्विवाहाला जास्त महत्व दिले.

**३.पडदा पद्धती :** स्त्रियांना अनावश्यकपणे विविध कार्य करताना 'परधा' किवा 'परदाह' एक अडथळा मानला. महात्मा गांधींच्या मते, पवित्रता मन आणि शरीराच्या शूद्धतेतून येते बुरख्याद्वारे नाही गांधींनी व्यवहारी जीवनात पडदा पद्धतीकडे दुर्लक्ष केले आणि नेहमी स्त्रियांना कुटुंबाच्या गर्भगृहात हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही प्रकरणामध्ये स्त्रियांना नेले जावे असा आग्रह धरला.

**४.महिला शिक्षण :** स्त्री व पुरुष समानता हा महात्मा गांधीचा महत्वाच्या विचारप्रवाह महिला शिक्षणामुळे बाहेर आला महिलांची मानसिक क्षमता पुरुषांच्या बरोबरीची आहे आणि म्हणून तिला शिक्षण घेण्याचा समान अधिकार असला पाहिजे असे गांधीजींचे स्पष्ट मत होते. एक आई मुलाचं भविष्य उज्वल घडवू शकते कारण मूल जास्तीत जास्त आईच्या सहवासात लहानाच मोठ होत असते.

**५.हुंडा पद्धती :** हुंडा पद्धतीला विरोध करण्याचे काम महात्मा गांधी यांनी केले त्यांच्या मते,जातीव्यवस्था संपुष्टात आणल्यास हुंडा निर्मूलन होईल. मध्यम व गरीब वर्गासाठी हुंडा देणे हे बाब खूप खर्चिक व त्रासदायक होती. म्हणून मुलींचा जन्म हा गरीब व मध्यम वर्गासाठी एक प्रकारचा त्रास अथवा शाप मानला जात होता यामुळेच लिंगभेद वाढीस लागला. महात्मा गांधीच्या मते एखाद्या पुरुषाने हुंडा मागितल्यास त्याला समाजातून बहिष्कृत केले पाहिजे तसेच मुलींच्या पालकांनी आपल्या मुलींचा विवाह जातीबाहेर व प्रांताबाहेर करण्यास मागेपुढे पाहू नये असे गांधीजींचे मत होते.

**६.घटस्फोट :** विवाह खर्च मोठ्या प्रमाणात करणे यासाठी महात्मा गांधीचा विरोध होता. महात्मा गांधींनी लग्न हे एक शिस्तीची अवस्था मानली आहे नैतिक पालन, समजुतदारपणा याद्वारे वैवाहिक संबंध चांगले टिकू शकतात.यामुळे घटस्फोटाची परिस्थिती टाळता येवू शकते.

**महात्मा गांधीच्या विचारानुसार स्त्रियांची भूमिका**

महात्मा गांधींच्या मते स्त्रिया भावी पिढी घडवण्यास जबाबदार आहेत.महात्मा गांधीजींच्या मते

301

स्त्री व पुरुष समान दर्ज्याचे आहेत परंतु एकसारखे नाहित ते अतुलनीय जोडीमध्ये येतात जे एकमेकांना पूरक आहेत. घरगुती जीवन हे पूर्णत: क्षेत्र स्त्री चे आहे तर बाह्य क्रियाकलाप हे पुरुषाचे क्षेत्र आहे म्हणून घरगुती व्यवहार, मुलांचे संगोपन आणि शिक्षण इ. विषयाचे ज्ञान स्त्रियांना अधिक असते त्यामुळे स्त्रिया ही जबाबदारी चांगल्या प्रमाणात पार पाडतात. महात्मा गांधीजींचा विशेष कल अहिंसेकडे होता म्हणून त्यांनी स्त्रियांना भारतीय लढ्यात सामील करून घेतले भारतीय स्वातंत्र्यात स्त्रियांच्या सक्रिय सहभागाची अपेक्षा महात्मा गांधींना होती त्यांच्या मते स्त्रियांच्यात आत्मविश्वासाची क्षमता प्रचंड असते. पुनर्विवाह, हुंडा पद्धती, बालविवाह,जरठ कुमारी विवाह, केशवपन, सती प्रथा, पडदा पद्धती यासारख्या वाईट गोष्टींविरूद्ध व्यापक मोहिम सुरू केली.

**भारतातील महिलांची सद्यस्थिती**

भारतात पितृसत्ताक पद्धती असल्याने स्त्रियांना नेहमी दुय्यमतेची वागणूक दिलेली आपल्याला पाहायला मिळते पूर्वी स्त्रियांना पुनर्विवाह, हुंडा पद्धती, बालविवाह, जरठ कुमारी विवाह, केशवपन, सती प्रथा, पडदा पद्धती इ. अनिष्ट प्रथांना सामोरे जावे लागत असे या महिलांविरुद्धच्या अपमानस्पद प्रथा नष्ट करण्यासाठी महात्मा गांधी यांनी वेगवेगळ्या चळवळींद्वारे या पद्धती बंद पाडत आणल्या. यामुळे स्त्रियांवरील अनिष्ट पद्धती मोडीत निघाल्या. समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळे आणि सरकारी धोरणे,कायदे यामुळे स्त्रीजीवनापेक्षा स्वातंत्र्यानंतरच्या कलावधीतील जीवन जास्त सुखकर झाले आहे.

विज्ञान-तंत्रज्ञान,शिक्षणातील विकास,सामाजिक,राजकीय बदल,आधुनिकीकरण यामुळे लोकांचा स्त्रियाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. आर्थिकदृष्ट्या महिलांची परिस्थिती सुधारली यामुळे स्त्रियांकडे समाज आदर्श म्हणून पाहू लागला. स्त्री खऱ्या अर्थाने सक्षम बनली. राज्यघटनेतील प्रास्ताविक नमूद केल्याप्रमाणे समानता आणि न्याय मिळवण्यात आपण अजुनही कुठेतरी मागे पडतोय जानगणनेनुसार (२०११) १००० पुरुषांच्या मागे ९४० स्त्रिया होत्या. जे की २००१ च्या जनगणनेच्या तुलनेत चांगले आहे भारतीय स्त्रियांच्या साक्षरतेचा दर हा ६५.४५ आहे यामुळे सध्यस्थितील स्त्री ही working woman व multi tasking आहे असे म्हणता येईल.

**निष्कर्ष :** महिला कितीही शिकल्या तरी त्यांना कौटुंबिक जबाबदारी पार पाडून आपला व्यवसाय सांभाळावा लागतो.पितृसत्ताक पद्धतीने महिलाना नेहमी दुय्यम लेखले आहे.महात्मा गांधीचा महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर विश्वास होता महिला सक्षमीकरणाच्या प्रत्येक टप्प्यावर नवीन समस्या वाढत आहेत. पूर्वी बालविवाह,केशवपण,सतीप्रथा,हुंडा प्रथा,पडदा पद्धती.विधवा पुनर्विवाह इ.समस्या व्यापक होते तर आधुनिक काळात ही प्रश्न नामशेष झालेले पाहायला मिळतात तर सध्यस्थितीत बलात्कार,छेडछाड,विनयभंग,ॲसिड हल्ला,कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण इ.अनेक गुन्हेगारी प्रवृत्ती महिलांच्या बाबतीत पाहावयास मिळतात यामुळे स्त्री सक्षमीकरणामध्ये अडथळे निर्माण झाले आहेत.

महिला सक्षमीकरण केवळ कुटुंबातील सदस्यांसाठी नसून समाजातील सर्व महिलांसाठी असायला हवे. सरकारने महिलांवरील सर्व प्रकारच्या गुन्ह्यांविरुद्ध कायदे करते पण समाजाची मानसिकता अजूनही फारशी बदललेली नाही ती बदलणे काळाची गरज बनली आहे. समाजात स्त्री पुरुष समानता रुजवण्याचे काम स्त्रियांच्या मार्फत केले जाते. त्यांनी आपल्या लहानपणापासून केवळ आपल्या कुटुंबातील महिलांचा नव्हे तर समाजातील प्रत्येक महिलेचे सन्मान करायला शिकवले पाहिजे तरच खरी क्रांती होईल आणि महिला सक्षमीकरणाचे स्वप्न साकार होईल.

**शिफारशी**

1. प्राथमिक स्तरापासून महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थिनींना विविध उपक्रमांच्या माध्यमातून मार्गदर्शन करावे.
2. समाजामध्ये सर्व घटकांनी महिलांना समान संधी देवून सक्षम होण्यासाठी सहकार्य करावे.
3. महिलांना विविध हस्तोउद्योग व कौशल्य विकसित करण्यासाठी तज्ज्ञानचे मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करावे.
4. स्त्रिया माहितीच्या आधिकाराविषयक तज्ज्ञांच्या व्याख्यानांचे आयोजन करावे.


Scanned with CamScanner

5. स्त्रियांसाठीची विविध नवीन धोरणे व कायदे याबाबत विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून मार्गदर्शन करावे.

संदर्भ

Bajpai,A,(2011)global challenges,global Gandhi and global india,world focus retried on 7 feb 2023

Despande, S and Sethi, S. (2010). Role and Position of women empowerment in Indian Society, International referred journal. Vol.1 issue 17. retried on 7 feb 2023

Deshamukh,M.(2019) mahatma Gandhi in the changing times,international multidisciplinary multilingual journal of contemporary research vol. 2 retried on 7 feb 2023

https://en.wikipedia.org/wiki/Mahatma_Gandhi retried on 9 feb 2023

https://mmhapu.ac.in/doc/eContent/Education/RinkiKumari/Sep2020 retried on 9 feb 2023

http://www.banipurbedcollege.org/e-learning-goutam retried on 8 feb 2023

https://www.mkgandhi.org/ebks/hindi/Gandhi-Ek-Jeevani.pdf retried on 8 feb 2023

https://www.Census.2011.co.in retried on 8 feb 2023

कृपलाणी.कृ. (१९८३)गांधी एक जीवनी, नवी दिल्ली: नॅशनल बूक ट्रस्ट.

देशपांडे.अ.,गुप्ता.अ.(२०११) गांधीजींचे असामान्य नेतृत्व,राजहंस प्रकाशन

प्रभू.आर,राव.यू. (२००२) महात्मा गांधी के विचार,नवी दिल्ली: नॅशनल बूक ट्रस्ट.

TRUE COPY

Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209

# Certificate

This is to certify that Dr./Shri./Smt.: डॉ. प्रतिभा स . देसाई has successfully published his/her book titled:- गणित विषयातील संपादणूक आणि सहकार्यात्मक अध्ययन कार्यनिती विकसन through Laxmi Book Publication with ISBN– 978-1-312-10583-6 in the Year 2023.

Printed by
**Laxmi Book Publication**
258/34, Raviwar Peth,
Solapur, Maharashtra, India.

Published by
**Lulu Publication**
Hillsborough St, Raleigh,
United States of America (USA).

302

Contact No. : 9595359435
Website: http://www.lbp.world
Email ID: apiguide2014@gmail.com

TRUE COPY
Principal
Aachanya Javdekar College of Education

Authorized Signature
Laxmi Book Publication